# प्रकरण पहिले

## रूपबंधाचे स्वरूप

पृष्ठ क्रमांक : १ ते ५०

# प्रकरण पहिले

# रूपबंधाचे स्वरूप

**प्रस्तावना :**

'स्त्रियांच्या कहाण्या : रूपबंधात्मक अभ्यास' हा विषय एम्. फिल्. च्या अभ्यासासाठी निवडला आहे.

या अभ्यासातील पहिले प्रकरण रूपबंधाचे स्वरूप असे आहे.

या पहिल्या प्रकरणात पुढील उप्रकरणांचा अभ्यास करणार आहे.

अ) लोकसाहित्य म्हणजे काय ?

ब) आदिबंधाचे स्वरूप.

क) कल्पनाबंधाचे स्वरूप.

ड) रूपबंधाचे स्वरूप.

रूपबंधाचे स्वरूप पाहण्यापूर्वी लोकसाहित्य म्हणजे काय ? हे पाहणे आवश्यक वाटले. लोकसाहित्य, आदिबंध, कल्पनाबंध या संकल्पना समजावून घेतल्यानंतर आपण रूपबंधाचे स्वरूप ही संकल्पना उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यानुसार आधी लोकसाहित्य ही संकल्पना सविस्तर समजावून घेऊ.

शारदेच्या गळ्यात मराठी साहित्याचा नवरत्नांचा हार तेजाने तळपतो आहे. या नवरत्नांपैकीच एक स्वयंतेजाने तळपणारे घसघशीत रत्न म्हणजे मराठी लोकसाहित्य होय. लोकसाहित्य हे चिरंतन अशा उदात्त जीवन व सांस्कृतिक मूल्यांचे जतन करणारे अक्षर वाङ्मय आहे. आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा म्हणजे लोकसाहित्य. भारतीय लोकसाहित्याचे दालन भव्य आणि दिव्य असून ते अत्यंत संपन्न आहे. लोकसाहित्य हे लोकांनी लोकांसाठी व लोक भाषेत निर्माण केलेले साहित्य असते. लोकसाहित्य म्हणजे लोकजीवनाचा आविष्कार ! आदिकाळात लोकांनी लावलेल्या या लोकसाहित्याच्या रोपट्याला अनेक धुमारे फुटले आणि लोकसाहित्याचा वृक्ष डौलदार झाला.

आदिमानव जेव्हापासून बोलू लागला. तेव्हापासून लोकसाहित्य अस्तित्वात असावे. हजारो वर्षापूर्वीची ही परंपरा काळानुसार बदलत, काही गोष्टींचा त्याग करीत, नव्या गोष्टींचा स्वीकार करीत आपल्यापर्यंत येऊन पोहोचली आहे. पारंपरिक लोकजीवनाचे स्पष्ट, निखळ प्रतिबिंब लोकसाहित्यात पडलेले दिसते. तसेच ते मराठी लोकसाहित्यातही दिसते. मराठी समाज मनाचा, भावभावनांचा सहज आविष्कार लोकसाहित्यात दिसतो.

लोकसाहित्य हा मौखिक परंपरेने चालत येणारा आणि समूहाकडून निर्माण केला जाणारा प्रकार आहे. आजच्या विज्ञानयुगात लेखन, तंत्रज्ञान, मुद्रण, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांचा दबदबा असणाऱ्या काळातही लोकसाहित्य टिकून आहे. लोकसाहित्याची परंपरा मौखिक आहे. त्यामुळे मौखिक पद्धतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोकसाहित्याचा प्रवाह अखंडपणे वहात आलेला आहे.

लोकसाहित्य या शद्वात लोककथा, लोकगीते, लोकनाट्ये, उखाणे, म्हणी, वाक्प्रचार, ओव्या अशा मौखिकाचा समावेश आहेच. पण त्याचबरोबर शेती करण्याची प्राचीन पद्धत, देवपूजा, वृक्षपूजा, सुतारकाम, लोहारकाम, सोनारकाम ही प्राचीन कौशल्ये, पाककला, भविष्य यांचाही समावेश होतो. विविध लोकरूढी, लोकसमजुती, विधी, परंपरासुद्धा लोकसाहित्यात समाविष्ट आहेत.

उदा. बाळ रडू लागले तर मीठ–मोहऱ्यांनी दृष्ट काढणे, कौल लावणे, नवस बोलणे असे प्रकार आजही आपणांस ग्रामीण भागात पहावयास मिळतात.

असे हे लोकसाहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परंपरेने चालत आले आहे. या लोकसाहित्याची संकल्पना आता समजावून घेऊ.

**अ) लोकसाहित्य म्हणजे काय ?**

मराठी साहित्यशारदेच्या पुष्पवाटिकेतील घमघमता चाफा म्हणजे लोकसाहित्य होय. हा चाफा तन–मन सुखावणारा, सुगंधी अनुभव देतो. कारण, लोकसाहित्य हा लोकसमूहाचा भावनिक आविष्कार असल्याने प्रत्येक व्यक्तीची मानसिक–भावनिक गरज भागली जाते. लोकसाहित्य आपल्याला एक वारसा प्राप्त करून देते. या लोकसाहित्याच्या वारशामुळे आपल्या मनात श्रेष्ठत्वाची भावना निर्माण होते. तसेच सर्जनशीलतेची जाणीव होते.

**मराठीतील लोकसाहित्याची संकल्पना :-**

आदि मानवापासून लोकसाहित्य अस्तित्वात आहे. पण, आपल्याकडे लोकसाहित्याच्या अभ्यासाला मात्र अलीकडच्या काळात सुरूवात झाली. पण, पूर्वीपासून मराठीमध्ये लोकसाहित्याचा अभ्यास सुरू आहे. अगदी कै. वि. का. राजवाडे, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांपासून ते कै. दुर्गाबाई भागवतांसह अनेक पूर्वसूरींनी लोकसाहित्याच्या अभ्यासाचा व्यापक व सकस पाया निर्माण केला आहे. विद्यापीठीय विद्यार्थी एवढेच त्यांचे लक्ष्य नव्हते. हीच परंपरा आज डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या पर्यंत पोहोचते, असे मत तारा भवाळकर यांनी व्यक्त केले आहे.[१]

मराठीत लोकसाहित्याचे संशोधन, अध्ययन सुरू झाले. तेव्हा 'फोक लोअर' साठी कोणता मराठी शद्ब वापरावा यावर अभ्यासकांत मतमतांतरे होती. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी मराठी 'लोकविद्या' शद्ब वापरावा असे म्हटले, तर ज्येष्ठ संशोधक दुर्गा भागवत यांनी फोक लोअरला 'लोकसाहित्य' हा शद्ब वापरावा असे सुचविले. 'लोकविद्या' हा शद्ब प्रचलित झाला नाही. मात्र दुर्गा भागवतांचा 'लोकसाहित्य' शद्ब सहजच वापरला गेला. तो अधिक योग्य ठरला, असे अभ्यासानंतर आढळले.

'लोकसाहित्य' हा शद्ब उच्चारल्यावर फक्त लोककथा, लोकगीते आहेत असा समज होतो. पण, 'लोकसाहित्य' या शद्बाची व्याप्ती फार मोठी आहे. लोकसाहित्य या शद्बात लोककथा, लोकगीते, उखाणे, म्हणी, वाक्प्रचार हे मौखिक आविष्कार समाविष्ट आहेतच. त्याशिवाय अनेकविध लोकसमजुती, लोकश्रद्धा, लोकविश्वास, लोकभ्रम, आचार-विचार, रूढी-प्रथा, परंपरा, विधी-विधाने, जादूटोणा, लोककला अशा अनेकविध गोष्टीही समाविष्ट आहेत. पारंपरिक खेळ, संगीत, नृत्य, नाट्य, वाद्य या लोककला, पारंपरिक चित्रकला, हस्तकला या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो. विविध समाजातील बारशापासून मर्तिकापर्यंतच्या चालीरीती, शास्त्रीय संगीत, मंगळागौरीची, भोंडल्याची गाणी, श्रावणातल्या कहाण्या, फुगड्या, झिम्मा, आदिवासी नृत्य, कोकणी दशावतार, वारल्यांचे तारपा वाद्य, नागपंचमीच्या दिवशी भिंतीवर रेखाटलेले नागाचे चित्र या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो.

लोकसाहित्य म्हणजे जीवनरीती.

लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृती.

लोकसाहित्य म्हणजे लोकमानसाची कृती आणि उक्ती.

लोकसाहित्य ही संकल्पना आपण पाहिली. आता 'लोक'आणि 'साहित्य'म्हणजे काय याची चर्चा करू.

**मराठी लोकसाहित्यातील 'लोक' ही संकल्पना :-**

इंग्रजी 'फोक लोअर' (Folklore) या शद्बासाठी मराठीत 'लोकसाहित्य' हा शद्ब रूढ झाला हे आपण पाहिले. या लोकसाहित्य शद्बातील 'लोक' शद्बाचा नेमका अर्थ काय? ते आता पाहू.

'लोक' या शद्बाचा सर्वसाधारण अर्थ जन, माणसे असा आहे. मात्र लोकसाहित्य या शद्बातील 'लोक' शद्बाला यापेक्षा वेगळा अर्थ आहे.

'लोक' हा शद्ब 'लोकृदर्शने' या संस्कृत धातूपासून आला आहे. त्याचा अर्थ 'पाहणे' असा आहे. यावरून पाहणारा जनसमुदाय म्हणजे 'लोक' होय. 'लोक' हा शद्ब भारतात प्राचीन काळापासून वापरण्यात येत असून ऋग्वेदातील प्रसिद्ध पुरुषसूक्तात. 'लोक' हा शद्ब 'जन' आणि 'स्थान'या दोन्हीही अर्थांनी वापरला आहे असे दिसते. निश्चित अशा एका अर्थाने सातत्याने हा शद्ब वापरला आहे असे मात्र दिसत नाही. प्रसिद्ध व्याकरणकार पाणिनी यांनी आपल्या अष्टाध्यायीमध्ये लोक आणि सर्व लोक या पदांचा उल्लेख केला आहे आणि या पदांना प्रत्यय लावून लौकिक आणि सार्वलौकिक हे शद्ब सिद्ध केले आहेत. तर वररूचींनी आपल्या वार्तिकातही 'लोक' हा शब्द वापरला आहे. त्याचप्रमाणे भरताच्या नाट्यशास्त्रातील चौदाव्या अध्यायात नाट्यधर्मी आणि लोकधर्मी प्रवृत्तींची चर्चा केली आहे.[२] अशा अनेक उल्लेखांवरून 'लोक' हा शद्ब प्राचीन काळापासून वापरलेला आहे हे लक्षात येते.

लोकसाहित्यातील 'लोक' या शद्बाचा अर्थ आपण पाहिला. आता 'साहित्य' हा शद्ब कोणत्या अर्थाने वापरला जातो ते पाहू.

**मराठी लोकसाहित्यातील 'साहित्य' ही संकल्पना :-**

'लोक' हा शद्ब विशिष्ट अर्थ सूचित करतो. त्याचप्रमाणे 'साहित्य' हा शद्बही विशिष्ट अर्थानेच वापरण्यात येतो.

'साहित्य' हा शद्ब आपल्या रोजच्या व्यवहारात आपण अनेकदा वापरतो. उदा. शिवणकामाचे साहित्य म्हणजे कापड, सुई, दोरा, कात्री, बटणे इत्यादी तर बांधकामाचे साहित्य म्हणजे विटा, सिमेंट, वाळू, खडी, लोखंड, इत्यादी याप्रमाणे स्वयंपाकाचे साहित्य, सुताराचे साहित्य, लेखनसाहित्य, चित्रकलेचे साहित्य असे शद्बप्रयोग आपण करतो. या शद्बप्रयोगात साहित्य या शद्बाचा अर्थ 'साधनसामग्री' असा असतो. साहित्यशास्त्रात कविता, कथा, कादंबरी, नाटक यासारख्या वाङ्मय प्रकारांना साहित्य म्हटले जाते. मात्र लोकसाहित्य या शद्बातील 'साहित्य' या शद्बाचा वेगळा अर्थ आहे. लोकसाहित्यातील 'साहित्य' म्हणजे वाङ्मय नव्हे तर साधनसामग्री आहे.

इंग्रजीमध्ये 'Folk lore' हा शद्ब वापरला जातो. तसाच 'Folk Literature' हा शद्बही वापरला जातो. मात्र ' Folk lore ' मध्ये ' Folk Literature' चा समावेश आहे. 'Folk lore' हा शद्ब व्यापक असून 'Folk Literature' हा त्याचा एक भाग आहे असे म्हणता येईल. 'लोकसाहित्य' या शद्बात इंग्रजीतील 'Lore' या पदासाठी 'साहित्य' हे पद आले आहे. याचा अर्थ व्यापक असल्यामुळे हेच पद स्वीकारले असे श्रीमती दुर्गा भागवत यांनी म्हटले आहे.[३]

साहित्य या पदात 'Lore' या इंग्रजी शद्बाच्या अर्थाच्या सर्व छटा नसल्या तरी आता गेल्या पंचवीस–तीस वर्षापासून महाराष्ट्रातील लोकसाहित्याचे अभ्यासक 'लोकसाहित्य' हीच संज्ञा 'Folklore' साठी वापरीत आहेत. त्यामुळे आता 'लोकसाहित्य' या शद्बातील 'साहित्य' या पदाचा 'Lore' हाच अर्थ घेणे योग्य ठरेल.

मराठी लोकसाहित्यातील 'लोक' आणि 'साहित्य'या संकल्पना आपण पाहिल्या. आता लोकसाहित्याच्या वेगवेगळ्या अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या अभ्यासू.

## लोकसाहित्य म्हणजे काय ? :

'लोक' म्हणजे काय आणि 'साहित्य'म्हणजे काय? या दोन्ही संकल्पना आपण पाहिल्या. आता लोकसाहित्य म्हणजे काय? ते पाहू.

मानवाचे समग्र जीवन म्हणजे लोकसाहित्य आहे. मानवाची जगण्याची धडपड सतत चालू असते. ही धडपड पोटासाठी असते. तशीच मनोरंजनासाठीही असते. प्रत्येक व्यक्तीला मनोरंजन हवे असतेच. यातूनच लोकसाहित्य निर्माण झाले. जगण्याची धडपड, मनोरंजन यातून प्रत्येक समाजाची विशिष्ट जीवनपद्धती घडत जाते. ही जीवनपद्धती म्हणजेच 'लोकसाहित्य'.

'लोकसाहित्य' शतकानुशतके चालत आले आहे. त्याची परंपरा निर्माण झाली आहे. मौखिक परंपरेने लोकसाहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आले आहे. प्रत्येक पिढी विशिष्ट विधी त्या-त्या वेळी करीत राहते व विशिष्ट विधी, विशिष्ट वेळी करायची ही परंपरा पुढची पिढीही टिकवून ठेवते. उदा. विवाहानंतर गोंधळ घालण्याचा विधी प्रत्येक पिढी आपल्या मुलाच्या लग्नात करते.

अशा तऱ्हेने लोकसाहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येते. लोकसाहित्याचा कर्ता अनामिक असतो. एखादी कथा, कहाणी, गीत कोणी रचले? याची निश्चित माहिती लोकांना मिळू शकत नाही. 'ऐका गणेश देवा, तुमची कहाणी. निर्मळ मळे, उदकाचे तळे -----' ही कहाणी नेमकी कोणी लिहिली ? 'ऐलमा, पैलमा गणेश देवा-----' या भोंडल्याच्या गीताचा रचनाकार कोण ? हे आपणाला कधीच कळू शकत नाही. कारण, अनके पिढ्या ही गीत म्हणतात व पुढच्या पिढीकडे सोपवतात. पुढील पिढी अगदी सहजपणे या कथा-कहाण्यांना आपल्या जीवनाचा भाग बनवते. ते गीत, ती कहाणी मग 'लोकसाहित्य' बनते.

लोकसाहित्य म्हणजे काय ? हे आपण पाहिले. आता लोकसाहित्याच्या काही व्याख्या पाहू.

## लोकसाहित्याच्या व्याख्या :

पाश्चात्य देशात आणि आपल्याकडेही लोकसाहित्याचा अभ्यास अनेक अभ्यासकांनी केला. लोकसाहित्य म्हणजे नेमके काय ? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. यातूनच काही अभ्यासकांच्या लोकसाहित्याच्या व्याख्या पुढे आल्या आहेत. त्या अशा –

**जोनास बॅलिस :**

जोनास बॅलिस यांच्या मते, ''लोकसाहित्य' हे आदिमानवनिर्मित असून परंपरागत असते, त्याचप्रमाणे सुसंस्कृत मानवानेदेखील निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याद्वारा पद्य किंवा गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी, लोककलाप्रकार त्याचप्रमाणे नृत्य, नाट्य इत्यादींचा अंतर्भाव होतो. लोकसाहित्य हे लोकसमूहाच्या आविष्काराचे शास्त्र नाही, तर लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या आविष्कारांचे शास्त्र आहे.' [४]

जोनास बॅलिस यांनी लोकसाहित्याची अतिशय व्यापक व्याख्या केली आहे. लोकसाहित्य हे आदिमानवाच्या काळापासून आले आहे. ते परंपरागत आहे असे सांगतानाच सुसंस्कृत मानवानेसुद्धा लोकसाहित्याची निर्मिती केली आहे यावर त्यांनी भर दिला आहे.

**मारियस बार्डो :**

मारियस बार्डो यांनी लोकसाहित्याची कल्पना स्पष्ट करताना त्याची व्यापकता दर्शविली आहे. 'विविध व्यवसायांचे ज्ञान, अनुभूती, शहाणपण, कौशल्य, सवयी आणि रूढी तसेच व्यवहार यासंबंधीचे ज्ञान शब्दाने किंवा कृतीने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत जे चालत येते त्या सर्वांस लोकसाहित्य म्हणावे.'[५]

अशी लोकसाहित्याची व्याख्या त्यांनी केली आहे.

**बी. ए. बॉटकीन :**

बॉटकीन यांनी लोकसात्यिाची व्याख्या केली, ती अशी –'वर्तमान समाजातील असे ज्ञान की, जे परंपरेने लोकजीवनात उपयोगात आणले जाते. वर्तमान समाजजीवनातील पारंपरिक संस्कृती विंशेष व जीवनविशेष म्हणजेच लोकसाहित्य होय.'[६] बॉटकीन यांनी परंपरेवर भर दिला आहे आणि भूतकाळाचे वर्तमानकाळाशी घट्ट नाते आहे तेही स्पष्ट केले आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**जे. एम. फॉस्टर :**

फॉस्टर यांनी केलेल्या व्याख्येनुसार 'लोकसमुहाच्या अलिखित म्हणजेच मौखिक रूपातील भाषाविष्काराचा, लोकविश्वास, लोकभ्रम, पारंपरिक खेळ, उत्सव, चेटूक इत्यादींचा समावेश लोकसाहित्यात होतो.'[७] या व्याख्येत फॉस्टर यांनी मौखिक आविष्कारावर भर दिला आहे.

**डॉ. प्रभाकर मांडे :**

मांडे यांनी म्हटले आहे, 'लोकसाहित्य म्हणजे लोकांची जीवन जगण्याची पद्धती'.[८] डॉ. मांडे यांनी लोकसाहित्यात लोकवाङ्मयाबरोबर लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या रूढी, समजुती, आचारविचार, धर्मविधी, लोकभ्रम, लोकनृत्य, लोकनाट्य या सर्वांचा समावेश आहे असे सांगितले आहे.

**डॉ. रा. चिं. ढेरे :**

डॉ. रा. चिं. ढेरे यांनी लोकसाहित्याची व्याख्या केली, ती अशी 'पारंपरिक लोकजीवन म्हणजे लोकसाहित्य होय.'[९] किंवा 'लोकमानसातील कृती–उक्तींचा आविष्कार म्हणजे लोकसाहित्य होय.'[१०] या व्याख्येत ढेरे यांनी पारंपारिक लोकजीवनावर आणि कृती–उक्तींच्या आविष्कारावर भर दिला आहे.

**गंगाधर मोरजे :**

मोरजे यांच्या मते, 'लोकसाहित्य म्हणजे जनसमूहाने आपल्या भावभावनांचा सार्थ शद्बांच्या माध्यमातून केलेला आविष्कार होय.'[११] मोरजे यांनी समाजाने संघटीतपणे व्यक्त केलेल्या भावनांना महत्त्व दिले आहे.

**डॉ. साहेबराव खंदारे :**

डॉ. खंदारे यांच्या मते, 'लोकसाहित्य हा समाज संस्कृतीचा प्रगट धर्म आहे.'[१२] या सर्व व्याख्यांवरून लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचे नाते जवळचे आहे असे स्पष्ट होते. लोकसाहित्य हे लोकांनी निर्माण केलेले, लोकांचे व लोकांसाठी असते असे म्हणता येईल. लोकसाहित्यातून लोकांची प्रकृती, लोकांची सर्जनक्षमता प्रगट होते. लोकसाहित्याच्या काही महत्त्वाच्या व्याख्या आपण पाहिल्या आता लोकसाहित्याचे स्वरूप पाहू.

**लोकसाहित्याचे स्वरूप :**

कोणत्याही समाजात आणि समाज कितीही प्रगत झाला, तरी त्यामध्ये परंपरेने आलेल्या अनेक चालीरीती, विधी, लोकसमजुती, लोकभ्रम, लोकश्रद्धा, विविध सण–उत्सव, व्रतवैकल्ये, पारंपरिक व्यवसाय व कौशल्ये असतातच. भारत हा तर सर्व प्रकारच्या परंपरा जतन करणारा देश आहे. त्यामुळे भारतात वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक अशी तीनही स्तरावर अनेक प्रकारच्या रूढी व समजुती आहेत. समाजाच्या पारंपरिक मानसिकतेचे रक्षण व जतन त्या करतात. त्याची अनेक उदाहरणे अगदी शहरी व शिक्षित समाजातही भरपूर असतात. त्यामुळे लोकसाहित्य हे केवळ प्राचीन किंवा केवळ ग्रामीण समाजाचे नसते हे लक्षात येईल.

लोकमानसातील कृती उक्तींचा आविष्कार म्हणजे लोकसाहित्य होय. यातूनच लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट होते.

१) समाजातील आचार–विचार, रूढी, प्रथा, परंपरा, रीतिरिवाज म्हणजेच लोकसाहित्य होय.

उदा. संक्रांतीला स्त्रिया एखाद्या मंदिरात वोवसायला जातात. एकमेकींना हळदी–कुंकू, तीळगुळ व मातीची सुगडी देतात. ही प्रथा, रूढी लोकसाहित्याचाच एक भाग आहे.

२) विविध सण, उत्सव, व्रतवैकल्ये, विधीविधाने लोकसाहित्यात समाविष्ट आहेत.

उदा. स्त्रिया वटसावित्रीचे व्रत करतात, वडाची पूजा करतात, उपवास करतात, वटसावित्रीची कहाणी वाचतात.

३) लोकविश्वास, लोकश्रद्धा, लोकसमजुती, लोकभ्रम म्हणजेही लोकसाहित्य होय.

उदा. चिंचेच्या झाडावर भुते असतात, भुताची पावले उलटी असतात ही लोकसमजूत आहे.

४) पारंपरिक व्यवसाय व कौशल्ये म्हणजे लोकसाहित्य होय.

उदा. खंडोबाची वाघ्या मुरळी किंवा गोव्यातील देवदासी.

५) मंत्र, तोडगे, जादूटोणा म्हणजे लोकसाहित्य आहे.

उदा. लहान बाळाला दृष्ट लागू नये म्हणून काळ्या मण्यांची मनगटी हातात घालणे, त्याची 'दृष्ट काढणे' म्हणजे लोकसाहित्याचा एक भाग आहे.

६) वनस्पती, नक्षत्रे, खनिज, प्राणी याबद्दलचे पारंपरिक समज गैरसमज लोकसाहित्यात मोडतात.

उदा. उंबराच्या झाडाखाली दत्ताचे स्थान असते, मुंगूस दिसले, भारद्वाजाचे दर्शन घडले की दिवस शुभ जातो या व अशा समजुती लोकसाहित्यात आहेत.

७) लोककथा, लोककथागीते, लोकगीते, उखाणे, म्हणी हा सर्व पारंपरिक मौखिक आविष्कार म्हणजे लोकसाहित्य आहे.

उदा. 'हातच्या काकणाला आरसा कशाला' किंवा 'घरोघरी मातीच्या चुली' अशा म्हणी आणि 'चल रे भोपळ्या टुणूक टुणूक' अशा कथा या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो.

थोडक्यात, जे जे पारंपरिक आहे, जे जे लोकांशी संबंधित आहे ते सर्व लोकसाहित्य आहे. लोकसाहित्याचे स्वरूप असे विशाल, सर्वव्यापी आहे. यावरून लक्षात येईल की, लोकसाहित्य हे त्या–त्या संस्कृतीचा एक स्वाभाविक प्रवाह असतो. मराठी लोकसाहित्य मराठी लोकांच्या जीवनाला आकार देते. त्याचप्रमाणे मराठी लोकांचा मराठी लोकसाहित्याच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे. मराठी लोकसाहित्य आणि मराठी लोकांचे जीवन यांचा परस्पर संबंध अतूट आहे.

लोकसाहित्याची संकल्पना, व्याख्या आणि स्वरूप आपण पाहिले. लोकसाहित्य ही व्यापक संकल्पना असून लोकवाङ्मय हा त्याचा एक भाग आहे हे समजावून घेतले.

'स्त्रियांच्या कहाण्यांचा रूपबंधात्मक अभ्यास' करत असताना लोकवाङ्मय ही संकल्पना सविस्तर, सखोल समजावून घेणे आवश्यक वाटते. म्हणून लोकवाङ्मय म्हणजे काय? ते आता पाहू.

**लोकवाङ्मय :**

लोकवाङ्मय हा लोकसाहित्याचा एक मोठा विभाग आहे. पारंपरिक जीवनपद्धतीतील अनेक विशेषांचा समावेश लोकसाहित्यात होतो. लोकसाहित्याचा केवळ मौखिक शाद्व आविष्कार म्हणजे लोकवाङ्मय असे म्हणता येईल. पारंपरिक लोकजीवनपद्धतीचा एक स्वाभाविक भाग म्हणून लोकवाङ्मयाला या लोकजीवनात अतिशय महत्त्व आहे. म्हणूनच लोकमनाचा सहजपणे झालेला आविष्कार लोकवाङ्मयात पाहावयास मिळतो. याशिवाय लोकजीवनातील अनेक घटकही लोकवाङ्मयाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या संबंधित राहतात. त्यातूनच लोकवाङ्मयाला आकार येत असतो, वेगळेपणा प्राप्त होत असतो. शतकानुशतके लोकजीवनात प्रचलित असलेल्या, एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत आलेल्या लोकश्रद्धा, लोकसमजुती, लोकरूढी, लोकप्रथा, लोकविधी, लोकसंगीत, लोककला आणि एकूणच लोकजीवनाची जगण्याची पद्धती यांचा प्रभाव लोकवाङ्मयावर पडत असतो. त्यांतून लोकजीवन घडत असते आणि या घडणींतूनच लोकवाङ्मय या वैशिष्ट्यांसह आकारास येत असते.

थोडक्यात, लोकवाङ्मय आणि लोकजीवन यांच्यात अतूट नाते असल्याचे आपणास पाहावयास मिळते. लोकजीवनाच्या बदलाचा परिणाम लोकवाङ्मयावर होत असल्यामुळे त्याचे स्वरूपही परिवर्तनशील असते. लोकवाङ्मयाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे लोकवाङ्मय हे लोकांनी निर्माण केलेले असते. ते मौखिक शाद्व असते. लोकवाङ्मयाची भाषा ही लोकांचीच बोलीभाषा असते. याशिवाय त्यातून लोकांच्या भावना व्यक्त झालेल्या पाहावयास मिळतात. जीवन जगताना, दैनंदिन काम करताना, मनोरंजनासाठी, खेळताना, सण–उत्सव साजरे करताना लोकवाङ्मयाची निर्मिती होत असते.

लोकवाङ्मय म्हणजे लोकजीवनाची गाथाच. कित्येक शतकांची परंपरा या लोकगाथेला असल्यामुळे लोकजीवनाचे काही अवशेषही त्यांत पाहावयास मिळतात


लोकवाङ्मय ही कुणा एका व्यक्तीची निर्मिती नसून ती समूहमनाची निर्मिती असते. त्यामुळे लोकमनाचा–समूहमनाचा, त्या मनातील विविध भाव–भावनांचा, जीवनाकडे पाहण्याच्या

दृष्टिकोनाचा आविष्कार त्यांतून होत असतो. ज्या लोकसमूहात या वाङ्मयाची निर्मिती झालेली असते. त्या लोकजीवनाचे प्रतिबिंब त्यात पडलेले असते.


थोडक्यात सांगायचे झाले तर, 'लोकांनी केलेले, लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेने चालत आलेले जे वाङ्मय तेच लोकवाङ्मय होय' असे आपणास म्हणता येईल. मराठीत लोकवाङ्मयाचे दालन समृद्ध आहे.

लोकसाहित्याच्या अभ्यासाची व्याप्ती जेव्हा वाढली नव्हती. तेव्हा केवळ लोकगीते, लोककथा म्हणजेच लोकसाहित्य आहे असे वाटत होते. पण, लोकसाहित्याचा विशेष अभ्यास केल्यानंतर हे मौखिक लोकसाहित्य संपूर्ण लोकसाहित्याचा एक भाग आहे हे लक्षात आले व या मौखिक लोकसाहित्याला उद्देशून लोकवाङ्मय ही संज्ञा वापरण्यात आली. या लोकवाङ्मयाच्या प्रकारांची अनेक प्रकारची तालिका विविध लेखकांनी केल्याचे आढळले. त्यांपैकी काही तालिका पुढीलप्रमाणे –

१) कृष्णदेव उपाध्याय :– यांनी लोकसाहित्याचे पुढील वर्गीकरण सुचवले आहे. [१३]




२) डॉ. कमलाबाई देशपांडे :– यांनी केलेले वर्गीकरण तालिका स्वरूपात असे दिसेल. [१४]



३) डॉ. प्रभाकर मांडे :- यांची तालिका पुढीलप्रमाणे –[१५]

मौखिक आविष्कार (लोकवाङ्मय)

लोककथा | लोककथागीत | लोकगीत | लोकनाट्य | उखाणे | म्हणी व वाक्‌प्रचार

वरील तीन तालिकांपैकी आपण डॉ. प्रभाकर मांडे यांनी केलेल्या लोकवाङ्मयाच्या तालिकेच्या प्रकारांचे स्पष्टीकरण आता पाहू.

**१) लोककथा :-**

लोककथांची परंपरा फार प्राचीन असून आदिम काळापासून त्या जनमानसांत रूजलेल्या आहेत. बदलत्या काळानुरूप त्या बदलल्या, प्रवाही राहिल्या, प्रगत होत गेल्या आहेत. छापण्याची कला अवगत होण्याआधी लोककथा मौखिक स्वरूपात कथन व श्रवण पद्धतीने चालत आल्या. समाजाने त्यांची जोपासना केली.

लोककथा कधी निर्माण झाल्या. ते नेमकेपणाने सांगता येत नसले तरी तिचा उगम प्रागैतिहासिक मानला जातो.

लोकवाङ्मयात लोककथांचे स्थान महत्त्वाचे आहे. आजही ज्या ठिकाणी मनोरंजनाची आधुनिक साधने उपलब्ध नाहीत. तेथे परंपरेने चालत आलेल्या लोककथा हेच लोकांच्या करमणुकीचे प्रधान माध्यम असते. रात्री आजी नातवांना पारंपरिक कथा सांगते. काही गावांमध्ये लोककथा सांगणारे लोककथाकथक असतात. त्यांची लोककथा सांगण्यासंबंधी प्रसिद्धी असते. विधीप्रसंगी गोष्ट सांगण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. काही कथा विधीत अंतर्भूत असून विधीचाच एक भाग असतात. विधिकथा किंवा व्रतकथा कहाण्यांच्या स्वरूपात रूढ आहेत. लोककथांचा समाजमनावरील हा प्रभाव प्राचीन काळापासून चालत आला आहे. भारत हा कथाप्रिय देश म्हणून नावाजलेला आहे. फार प्राचीन काळापासून भारतीयांची कथावाङ्मयाकडे पाहण्याची दृष्टी भाविकांची आहे. कथा किंवा कहाणी सांगितली तर इच्छित फलप्राप्ती होते, पुण्य मिळते अशी समजूत आहे. अशुभ निवारणासाठीसुद्धा लोककथा सांगितली जाते असे दिसते. कातोडी, ठाकूर इ. जातींतील स्त्रिया बाळबाळंतिणीला सुख लाभावे म्हणून पाचवी आणि सहावीच्या रात्री कथा सांगतात.[१६]



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

भारतीयांनी कथांना धर्माचरणाशी जोडले. कथा सांगणे आणि ऐकणे याला धर्माचरणाशी जोडले. कथा सांगणे आणि ऐकणे याला धर्माचरणाचा एक भाग बनविले. धर्माविषयी आणि व्रते यांच्याविषयी त्याचे नाते निर्माण केले. त्यामुळे लोककथांचे स्थान भारतीय समाजामध्ये प्राचीन काळापासून अबाधित राहिले.

कथा, कहाणी, गोष्टी या मानवी जीवनप्रवाहाबरोबरच चालत आलेल्या असल्याने मराठी कथेचा किंबहुना विश्वसाहित्यातील कोणत्याही कथेचा आरंभकाल तसा निश्चित सांगणे कठीणच आहे दंतकथा–लोककथा–अद्‌भूतरम्य परिकथा–प्राणिकथा–धार्मिक कहाण्या–दैवतकथा–नीतिकथा–बोधकथा आबालवृद्धापर्यंत मानवी जीवनात वावरत असलेल्या दिसून येतात. मानवी श्रद्धा, परंपरा, धार्मिक–सामाजिक रूढी, चालीरीती, राजकीय व्यवस्था आणि सनातन भाववृत्ती इ. मानवी जीवनातील अंगोपांगातील अनुभवांच्या कल्पना विश्वातून कथेचा प्रवाह मौखिक, लिखित स्वरूपात अव्याहतपणे चालत आलेला दिसतो. कथा सांगणे आणि कथा ऐकणे ही एक मानवी गरजच असावी असे दिसते. अशा गरजेतून पिढ्यान्‌पिढ्या समाजातील सर्व थरातून कथेचा वावर झालेला आढळतो.

लोककथांची जोपासना ही विशेषत: खेड्यातील शेतकरी कुटुंबामध्ये होत असल्याने जनावरांच्या जीवनातील अद्‌भूत चमत्कार, धनी व जनावरे यांचे परस्परांवरील प्रेम, पशुपक्ष्यांची मानवाशी झालेली मैत्री इ. विषयांनी लोककथा रंगलेल्या दिसतात.

या कथांची भाषा ओघवती, साधी आणि घरगुती आहे. तिच्यात जिव्हाळा आहे. केव्हा–केव्हा ती ओबडधोबड व रांगडी वाटली तरी तिचे अंतरंग प्रेमळ आहे.

लोककथा म्हणजे काय? हे आपण पाहिले. आता लोककथागीत म्हणजे काय? ते पाहू.

**२) लोककथागीत :–**

लोककथागीतासाठी इंग्रजीमध्ये 'बॅलेड' ही संज्ञा वापरली जाते.[१७] गीताद्वारे सांगितली जाणारी कथा म्हणजे 'लोककथागीत' असे म्हणता येईल.

लोककथागीत मौखिक परंपरेने चालत आलेले असते. त्याचा निर्माता अज्ञात असतो. कोणातरी एका व्यक्तीने या गीताची रचना केलेली असली तरी कालक्रमात त्याचे नाव गळून पडलेले असते. रचनेत रचनाकाराच्या व्यक्तित्वाचे प्रतिबिंब नसते, त्यातून सामुहिक भावनेचा आविष्कार झालेला असतो. लोककथागीते वाद्यसंगीतासह नाचून साभिनय सादर केली जातात. सादरीकरणाचे स्वरूप सामुहिक असते. ही कथा रात्रारात्रभर सांगितली जाते. कथेची लांबी प्रदीर्घ असली तरी आवश्यकतेनुसार लोककलावंत त्यात काटछाट करीत असतो. त्यामुळे लोककथा गीताचा अमुक एक पाठ मूळपाठ आहे असे म्हणता येत नाही. भर घालणे आणि काटछाट करण्याची प्रक्रिया लोककथागीतांमध्ये अखंडपणे सुरू असते. ध्रुवपदांची पुनरावृत्ती झाल्याने कथागीताला लय प्राप्त होत असते. लोककथागीत मौखिक असते. त्यात सर्वसामान्य नायकाचे चित्रण केलेले असते. रचनाविष्कारात स्वाभाविकता असते. अभिव्यक्तीमध्ये मुक्ततेचे तत्त्व असते.

प्राचीन काळापासून मागध, बंदी, कुशीलव, वैय्यालिक, चारण, भाट, जोगी या लोकगायकांनी लोककथागीतांची परंपरा जोपासली आहे असे दिसते. नंतरच्या काळात लोकसंस्कृतीच्या अनेक उपासकांनी आणि स्त्रियांनीदेखील लोककथागीतांची परंपरा अखंडपणे सुरू ठेवलेली आहे.

भारतात कथात्मक लोकगीतांसाठी निश्चित अशी संज्ञा नाही. निरनिराळ्या देशांत निरनिराळे शद्ब वापरले जातात. पोवाडा, लोककथागीत, लोकगीतकथा असे शद्ब प्रचलित आहेत. इंग्रजीत कथात्मक गीतांसाठी 'Ballad' हा शद्ब वापरला जातो. 'बॅलेड' हा शद्ब लॅटिन भाषेतील 'Ballare' या शद्बापासून व्युत्पादिला जातो. 'Ballare' याचा अर्थ 'नृत्य करणे'.[१८] यावरून स्पष्ट होते की, प्रारंभी नृत्याच्या साथीने म्हटल्या जाणाऱ्या गीतालाच 'Ballad' म्हणत होते. कालांतराने त्यातील नृत्यांचा भाग गौण होऊन शेवटी तो नष्ट झाला.आता कथात्मक गीतासाठीच 'Ballad' हा शद्ब वापरला जातो. 'बॅलेड' या शद्बाच्या व्युत्पत्तीवरून नृत्याच्या साथीने म्हटल्या जाणाऱ्या कथात्मक गीतासाठी हा शद्ब होता व नंतर तो कथागीतासाठी वापरला जाऊ लागला.

'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका' या कोशात लोककथागीतांची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे. 'लोककथागीतात अशी पद्यशैली असते, ज्याचा निर्माता अज्ञात असून ज्यात एखादे

आख्यान वर्णिलेले असते. जी मौखिक परंपरेने प्रचलित असून ज्यात ललितकलांच्या सूक्ष्मतेचा अभाव असतो.'[१९]

थोडक्यात लोककथागीतांच्याबद्दल असे म्हणता येईल की, 'लोककथागीत हे लोकसमूहात मौखिक परंपरेने चालत आलेले कथात्मक लोकगीत असते.'

लोककथागीतांत सर्वसाधारणपणे पुढील विशेष असतात.

१) लोककथागीत गेय असते.

२) ते कथात्मक असते.

३) त्याचा रचनाकार अज्ञात असून त्याचा रचनाकालही अज्ञात असतो.

४) निर्मात्याच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यात अभाव असतो.

५) ती मौखिक परंपरेने लोकसमूहात चालत येतात.

६) सामुहिकता हा त्याचा एक विशेष असतो.

७) लोककथागीते साधी आणि अनलंकृत असतात.

लोककथागीत समजावून घेतल्यानंतर आपण आता लोकगीताचे स्वरूप पाहू.

## ३) लोकगीत :-

मराठी लोकवाङ्मयाचा बराचसा भाग लोकगीतांनी व्यापला आहे. भारतात लोकगीतांची परंपरा फार प्राचीन आहे. वेद, ब्राह्मण ग्रंथ, पुराणे त्याचप्रमाणे बौद्ध आणि जैन वाङ्मयात लोकगीतासंबंधीचे उल्लेख ठिकठिकाणी अभ्यास केल्यानंतर आढळले. उद्दिष्टांच्या दृष्टीने लोकगीतांचा विचार केल्यास असे दिसते की, बहुविध उद्दिष्टांनी लोकगीते म्हटली जातात. मनोरंजन, श्रमपरिहार, धार्मिक विधीचे एक अंग म्हणून, भावाभिव्यक्ती, उपचार करण्यासाठी मंत्रोपचार, उपासना, लोकनृत्याला साथ, नीतिबोध इत्यादी अनेकविध प्रयोजने लोकगीतांची आहेत.

आता आपण लोकगीतांच्या काही व्याख्या पाहू.

**लोकगीताच्या व्याख्या :**

मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकगीतांतून लोकजीवनाचा आविष्कार घडत असतो. लोकजीवनाबरोबरच लोकमनाचे, त्या मनातील विविध भावभावनांचेही उत्कट दर्शन लोकगीतांतून घडते. या लोकगीताच्या व्याख्या पुढीलप्रमाणे –

**सरोजिनी बाबर**

लोकगीताची व्याख्या करताना डॉ.सरोजिनी बाबर म्हणतात, 'विविध प्रकारच्या जातिवंत स्वर विलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षांमागे रचले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यान्‌पिढ्या आपल्या नवनवोन्मेषशाली तेजाने पुढच्या पिढील उत्तेजित करणारे भावगीत, असे लोकगीताविषयी म्हणण्यास हरकत नाही. हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय.' [२०]

डॉ. सरोजिनी बाबर यांनी मौखिक परंपरा, लोकजीवनाचा आविष्कार, भावात्मकता आणि संक्रमणशीलता ही लक्षणे लोकगीताच्या संदर्भात सांगितली आहेत. लोकगीत हे मौखिक असून ते परंपरेने चालत आलेले आहे. लोकगीताची निर्मिती अशिक्षितांकडून होत असते. लोकगीत कसल्याही वाद्यांच्या साथीशिवायच गायले जाते. इत्यादी लोकगीताची वैशिष्ट्ये व्याख्येवरून व्यक्त होतात.

**डॉ. स. कृ. फडके :**

फडके यांच्या मते, 'शास्त्रीय नियमांची विशेषशी पर्वा न करता सामान्य लोकव्यवहाराच्या उपयोगासाठी माणसे आपल्या आनंदाच्या उल्हासात ज्या वाणीचा सहज आणि छंदोबद्ध आविष्कार करतात, ते लोकगीत समजावे.'[२१]

या व्याख्येत फडके यांनी वाणीच्या सहज आणि छंदमयी आविष्कारावर भर दिला आहे.

**डॉ. कुंजविहारी दास :**

दास यांनी म्हटले आहे, 'सभ्य आणि शिष्ट जीवनापासून दूर आणि कमी–अधिक रांगड्या अवस्थेत असलेल्या लोकांची जीवनविषयक अभिव्यक्ती म्हणजे लोकगीत होय.'२२

डॉ. कुंजविहारी दास यांनी सामान्य, रांगड्या अवस्थेतील लोकांच्या जीवनातून व्यक्त होणाऱ्या सुखदुःखाच्या घटना, एखादी श्रद्धा लोकगीतातून व्यक्त होते असे सांगितले आहे.

या सर्व व्याख्यांवरून असे दिसते की, लोकगीतांना अनेक शतकांची दीर्घ परंपरा लाभली असून ती लोकसमूहाने निर्मिलेली असतात तशीच ती लोकसमूहाने गायिली जातात. त्याचप्रमाणे लोकगीत प्रामुख्याने अशिक्षितांची निर्मिती असल्याचे दिसते. लोकगीतांना काळाचे बंधन नसून ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात राहतात.

लोकगीत प्रत्येक काळात निर्माण होते आणि प्रचलित राहते. लोकगीते बोलीभाषेत असून त्यांना काही पारंपरिक चाली असतात. त्यातला ठेका अचूक असतो. लोकगीतांची निर्मिती लोकजीवनातून होत असते. म्हणून लोकगीतातून लोकजीवनाचे दर्शन घडते. काही लोकगीते विधीसंबंधी असतात.

उदा. विवाहप्रसंगी हळद लावताना म्हणावयाची गीते.

काही गीते क्रियासंबंधी असतात.

उदा. जात्यावरच्या ओव्या, फेरावरची गाणी इत्यादी लोकगीतात काही शद्व निरर्थक असतात. त्या गीताची लय आणि ताल कायम ठेवण्यासाठी हे निरर्थक शद्व आवश्यक असतात.

'आपडी थापडी गुळाची पापडी' या बालगीतातील हे शद्व अर्थपूर्ण नाहीत. पण, त्यांना एक प्रकारची लय आहे. लोकांच्या दैनंदिन वापरातील शद्व लोकगीतात असतात. त्यामुळे लोकगीतांना जिवंतपणा येतो. सामान्यपणे लोकगीताचे तीन प्रकार मानले जातात ते असे–

१) पुरुषांची लोकगीते :–

मराठी लोकगीताचा काही भाग पुरुषांच्या गीतांनी व्यापलेला आहे. त्याचेही पुढे तीन प्रकार पडतात. ते पुढीलप्रमाणे –

अ) मराठी लोकसंस्कृतीच्या उपासकांची गीते :–

वासुदेव, गोंधळी, वाघ्यामुरळी, पोतराज, भराडी, कुंभार हे उपासक विशिष्ट पारंपरिक पोशाख धारण करून विशिष्ट वस्तू हातात घेऊन गीते म्हणतात.

ब) शेतातील कामे करताना म्हटली जाणारी गीते :–

पारंपरिक लोकजीवन शेतीशी बांधलेले आहे. नांगरणी, पेरणी, खुरपणी, शेताला पाणी देणे, कापणी, सुगी अशी शेतातील कामे करताना कष्ट कमी होण्यासाठी शेतकरी गीते गातो.

क) सण–उत्सव प्रसंगी म्हटली जाणारी गीते :–

दसरा, बैलपोळा इत्यादी सणांच्यावेळीही पुरुष लोकगीते म्हणतात.

२) स्त्रियांची लोकगीते :–

मराठी लोकगीतांचा बराचसा भाग स्त्रियांच्या लोकगीतांनी व्यापला असून, लोकगीते म्हटली की, स्त्रीगीतांचाच उल्लेख करावा, इतकी स्त्रीगीतांची संख्या विपुल आहे. त्याचेही पुढे तीन प्रकार पडतात. ते असे –

अ) ओवीगीते :–

जात्यावर दळताना कष्ट, श्रम कमी करण्यासाठी स्त्रिया ओवीगीते गात असत. यामध्ये देवदेवतांची, पौराणिक संदर्भाची, कौटुंबिक नात्यातील संदर्भाची गीते त्या गात असत.

ब) विधीगीते :

स्त्रीजीवनात विविध विधींना विशेष महत्त्व आहे. विवाह, डोहाळजेवण, पाचवी पूजा, बारसे इत्यादी विधी प्रसंगी म्हणायची अनेक गीते उपलब्ध आहेत.

क) फेरावरची गीते :–

सण–उत्सवाप्रसंगी आजही स्त्रिया फेर धरुन गीते म्हणतात. वट पौर्णिमा, नागपंचमी, मंगळागौर, संक्रात इत्यादी सणांना फेर धरतात.

३) लहान मुलांची गाणी :–

मराठी लोकगीतांत लहान मुलांसाठी म्हटली जाणारी गीते आढळतात. या गीतांना फारसा अर्थ नसला तरी एक प्रकारचा ताल, लय, ठेका असतो. बाळाची आई, आजी पिढ्यान्‌पिढ्या ही गीते म्हणत आल्या आहेत.

लोकगीते ही सामान्यपणे समुदायाने गायली जातात. त्यांना एक आंतरिक लय असते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कित्येक लोकगीते नृत्य करत असताना गायची असतात. त्यामुळे ती तालबद्धही असतात. म्हणजेच गीत, नृत्य आणि संगीत अशा तीन प्रकारांनी लोकगीतांची अभिव्यक्ती होत असते.

लोकवाङ्मयाच्या प्रकारांपैकी लोकगीत म्हणजे काय? ते आपण समजावून घेतले. आता लोकनाट्याचे स्वरूप पाहू.

**४) लोकनाट्य :-**

नाटक ही पराकोटीची कृतिशील आणि जिवंत अशी कला आहे. नाटक ही कला अनादी आहे, अनंत आहे. ही कला सार्वजनिक आहे, तशी सार्वत्रिकही आहे. स्त्रीपुरुष, रंगरूप, जातपात, वर्णवंश अशा कुठल्याही मर्यादा नाट्यकलेला नाहीत.

भारतात हजारो वर्षापासून नाट्यकलेची परंपरा आहे. ग्रीक देशानंतर नाटकाची प्राचीन परंपरा असलेला भारत हा एकमेव देश आहे, असे अभ्यास केल्यानंतर आढळले.

समाजाच्या सांस्कृतिक जीवनात लोककलांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. अशा कलांत लोकनाट्याला एक वेगळेच स्थान आहे. विधींचे आचरण करणे आणि लोकांचे मनोरंजन करणे या उद्देशातून लोकनाट्याचा जन्म झाला आहे.

लोकनाट्य म्हणजे प्रयोगरूप लोककला. ही सादर केली जाणारी कला आहे. त्यामुळे नृत्य, संगीत, अभिनय आणि भाषा ही या कलेची मूलभूत अंगे होत.

विधिगीते आणि आदिम नृत्ये यांतून उत्क्रांत झालेला हा कलाप्रकार आहे. सुफलीकरणाचे विधी, कृषिदैवते, वीरगळांची पूजा, धार्मिक रीती–रिवाज, सण–उत्सव, जन्म–मृत्यू इत्यादी आनंदमयी व शोककारक घटनांच्या निमित्ताने लोक सांघिक गीते गात व नृत्य करीत या लोकपरंपरेतूनच लोकनाट्य हा सादरीकरणाचा प्रकार विकसित झाला.

मुखवटे घालून केला जाणारा बोहाडा, भवाई, यक्षगान, रामलीला हे भारतीय लोकनाट्यप्रकार विधीनाट्यातूनच विकसित झाले आहेत. संस्कृत नाट्यप्रकारातील अनेक रूपक व उपरूपकप्रकार लोकनाट्याचीच परिष्कृत रूपे असल्याचे आपणास दिसते. डिम, प्रहसन, भाण, हल्लीसक, रासक, रास, लास्य, लास्यनाटक, नर्तन इत्यादी प्रकारांची बीजे लोकनाट्यात आढळतात.[२३]

लोकनाट्याचे सादरीकरण धार्मिक सण उत्सवात होत असते. त्यासाठी मुद्दाम विकसित करण्यात आलेल्या आधुनिक रंगमंचाची गरज नसते. सडकेवर, मोकळ्या मैदानात ही लोकनाट्ये सादर केली जातात. काही लोकनाट्ये नृत्यप्रधान असतात तर काही हास्य विनोदाला प्राधान्य देणारी प्रहसनात्मक स्वरूपाची असतात. पौराणिक आख्याने आणि सामाजिक वीरकथा या लोकनाट्यातून संप्रेषित करण्यात येतात.

भारतात निरनिराळ्या प्रांतात लोकनाट्यांच्या परंपरा चालत आलेल्या आहेत.[२४].

उदा.– उत्तरप्रदेशात – रामलीला, नौटंकी, भाण, स्वांग.

मध्यप्रदेशात – माँच.

गुजरातमध्ये – भवाई व रास

महाराष्ट्रात – तमाशा, ललित, गोंधळ, दशावतार.

बंगालमध्ये – जात्रा, रास

आंध्रमध्ये – भागवत.

कर्नाटकात – यक्षगान.

ही लोकनाट्ये प्रचलित आहेत.

लोकनाट्यातून लोकजीवनाचे वास्तवरूप आणि रूढी परंपरेतून आलेल्या संस्कार विशेषांचे दर्शन घडते. क्षेत्रीय संस्कृतीचे प्रतिबिंब हे लोकनाट्याचे वैशिष्ट्य असून तेथील जीवनशैलीचा एक अंगभूत भाग म्हणून लोकनाट्य सादर केले जाते. म्हणून ही लोकनाट्ये विधी, उत्सव, जत्रा आणि धार्मिक सण–समारंभाच्या वेळीच सादर केली जातात. कलात्मक रंगमंचाहून लोकनाट्य निराळे असते ते याचमुळे.

थोडक्यात, लोकांनी लोकांसाठी जी रंगभूमी निर्माण केली ते लोकनाट्य होय. लोकांचे आयुष्य, जीवनपद्धती, त्यांचे जीवनमान याच्यात बदल घडून आला तर लोकनाट्यातही बदल घडून येणार. जवळजवळ १७ व्या शतकापर्यंत संस्कृत नाटके लोप पावून सर्वत्र लोकनाट्य रंगभूमी सुस्थिर झाली होती. त्यावेळी प्रेक्षकवर्ग मोठ्या प्रमाणात तयार झाला. नर्तक, नट, गायक यांचा

व्यावसायिक वर्ग निर्माण झाला. अशा तऱ्हेने प्राचीन काळापासून भारतात लोकनाट्य रंगभूमी अस्तित्वात होती.

लोकनाट्य म्हणजे काय? हे आपण पाहिले. आता उखाणा या लोकवाङ्मय प्रकाराची चर्चा करू.

**५) उखाणा :-**

मराठी लोकवाङ्मयात उखाणा हे एक मौल्यवान लेणे आहे. उखाण्यांचे दालन आगळ्यावेगळ्या वैशिष्ट्यांनी उठून दिसते आहे. उखाण्यांचा प्रकार प्राचीन काळापासून परंपरेने चालत आला असून त्यात नेहमीच नवीन भर पडत आलेली आहे.

उखाणा कधी भव्य-दिव्य विचार बोलून दाखवतो तर कधी थट्टामस्करी करतो. कधी मिस्किल अशा विनोदाने गालावर खळी पाडतो तर कधी ऐकणाऱ्या व्यक्तीला कोड्यात टाकतो.

'उखाण्याची प्रथा अभंग आहे.' असे दुर्गा भागवत यांचे मत आहे.[२५] उखाण्याची बैठक धार्मिक आणि सांस्कृतिक आहे. ज्ञान देणे व मनोरंजन करणे हेच उखाण्याचे ध्येय असल्याचे आपणास आढळते. महाराष्ट्रात सण-उत्सव, लग्नविधी अशा प्रसंगी उखाणे घेतले जातात. गोपन हा उखाण्याचा मुख्य विषय असतो. मूळ अर्थ लपवून बाह्यत: दुसराच अर्थ व्यक्त करावयाचा हे उखाण्याचे स्वरूप असते.

उदा.- 'पाऊस नाही, पाणी नाही, रान कसे हिरवे ?
कात नाही, चुना नाही, तोंड कसे रंगले ?' (पोपट)

**उखाण्याचे स्वरूप :-**

'उखाणा' या शद्बाला अनेक प्रतिशद्ब आहेत. दुर्गा भागवत यांनी उखाण्याला संस्कृतमध्ये ब्रह्मोद्य, कूट, प्रहेलिका, प्रवल्हिका असे प्रतिशद्ब योजले आहेत.[२६] उखाण्याचा विस्तार प्रश्न व उत्तर यात असतो. उखाण्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी अधिक भव्य व प्राचीन आहे. उखाण्यांमध्ये मार्मिक व खटकेबाज विनोद असतात. उखाण्याची घडण सुबक आणि नेटकी असते. तसेच गूढतेमुळे एक विशिष्ट सौंदर्य उखाण्यांला लाभलेले असते. मनोरंजक उखाणे सोडले तर ठराविक वेळी व ठराविक विधींत किंवा समारंभांतच उखाण्याचा वापर केला जातो. उखाण्याचा प्रकार जगात विविध रूपांत

वावरताना दिसतो. उखाण्याचे साधारणत: दोन प्रकार पडतात. ते पुढीलप्रमाणे :–

१) प्रश्नोत्तर स्वरूपाचे उखाणे / कूटात्मक उखाणे :–

प्रश्नोत्तरी स्वरूपाच्या उखाण्यांना 'कूट' असेही म्हणतात. या उखाण्याचा विस्तार प्रश्न व उत्तर यात असतो. प्रश्न विचारणारा एक आणि उत्तर देणारा दुसरा असे दोन घटक असतात.

प्रश्न विचारणारा रूपकाच्या आश्रयाने एखादी गोष्ट लपवतो. ही लपवलेली गोष्ट म्हणजेच गोपन हा उखाण्याचा प्राण असतो.

वेदकाळातील कवींनी रचलेली ब्रह्मोद्ये व मराठीतील कूट हे दोन्ही प्रश्नोत्तर रूपात असल्याचे आपल्या लक्षात येते. महाराष्ट्रात 'कलगी तुरा' या प्रकारात अध्यात्मिक आशयावर रचलेली अनेक कुटे उपलब्ध असल्याचे दिसते.

प्रश्नोत्तरी उखाण्याचे उदाहरण :–

उदा. – 'आपल्या मार्गाने एकटाच कोण जातो ?
नव्याने फिरून सदैव कोण जन्माला येतो ?
थंडीला औषध कोणते ?
धान्याच्या सर्वांत मोठ्या कोठाराचे नाव काय ?'

अशा पद्धतीने उखाणा घालणारा लयबद्ध रचनेत प्रश्न विचारतो आणि उत्तर देणारा एका शद्वात या प्रश्नाचे उत्तर देतो, असे –

'सूर्य आपल्या मार्गाने एकटाच जातो.
चंद्र नेहमी नव्याने जन्माला येतो.
थंडीवर विस्तव हे औषध आहे.
पृथ्वी हे सर्वांत मोठे धान्याचे कोठार आहे.'

असे उखाणे मराठीत विपुल आढळतात. या उखाण्यात विषयाची विविधता असते. उखाण्यातील लालित्य व कलात्मकता लक्षणीय असते. रूपकाच्या आश्रयाने केलेली गुंफण

आश्चर्यचकित करणारी असते. हा प्रश्न ऐकणाऱ्याला कोड्यात टाकतो. विचार करायला लावतो. रचनेच्या दृष्टीने या उखाण्यांचे स्वरूप सुटसुटीत, सहज आकलनीय असले तरी त्यातील गूढ सहजरीत्या उकलत नाही.

२) प्रश्नविरहीत उखाणे/नाव घेण्याचे साधे उखाणे :-

प्रश्नविरहीत उखाण्याची रचना साधी, सोपी व सहजस्फूर्त असते. यात फक्त गोपनक्रिया असते. या उखाण्यांची रचना गद्यात्मक असली तरी ती पद्याकडे झुकणारी असते.

नाव घेण्याचा उखाणा याला आपल्याकडे 'आहाणा' असेही म्हणतात. पतीने पत्नीचे किंवा पत्नीने पतीचे नाव उखाण्यातून गुंफून घेणे अशी प्रथा रूढ आहे. लग्नानंतर नववधू आपल्या पतीचे नाव लाजत-लाजतच पहिल्यांदा घेते. हे मराठी संस्कृतीचे भूषणच वाटते. याशिवाय लग्नसमारंभ, हळदी-कुंकू इत्यादी समारंभांच्या निमित्ताने स्त्रिया पतीचे नाव उखाण्यांमधून घेतात. उखाण्याच्या पहिल्या ओळीत साजेसे वर्णन असते आणि दुसऱ्या ओळीत नावाची कलात्मकरीतीने गुंफण केलेली असते. अशा प्रकारच्या उखाण्यात प्रतिपक्षाकडून उत्तराची अपेक्षा नसते. कल्पकता व भावसौंदर्य हे या उखाण्यांचे विशेष आहे.

पतीचे नाव उखाण्यामधून घेताना, त्यामध्ये सुखी संसाराचे वर्णन केलेले आढळते. खेड्यातील स्त्रियांचा उखाणा अनेकदा लांबलचक असतो.

उदा. – बालपण गेले मातापित्यांच्या पंखाखाली,
तारूण्याच्या वाटेवर मिळाली मैत्रीची साथ,
संसाराच्या वळणावर, मिळाला -------- रावांचा प्रेमळ हात.

याउलट, सुशिक्षित किंवा शहरी स्त्रियांचा उखाणा लहान असतो.

उदा.– कमळाच्या फुलावर बसले पक्षी ------- रावांचं
नाव घेते चंद्र-सूर्य आहेत साक्षी.

या प्रकारच्या उखाण्यांतून विविधता, नावीन्य, बदलत्या सामाजिक स्थितीचे दर्शन घडते. कौटुंबिक नातीगोती, सणासुदीचे विशेष, घराण्याची रीतभात, परमेश्वराची भक्ती इत्यादींची

कलात्मक गुंफण पाहावयास मिळते. उखाणा घेणाऱ्याचे बुद्धीवैभव, शद्बसौष्ठव दिसते. इतरांबद्दलचा आदर दिसतो. उखाण्याची परंपरा भारतातील सर्वच प्रांतात दिसते. उखाण्याची कलात्मक व अर्थपूर्ण रचना, त्यातील कल्पना, विचारांची मांडणी आणि त्यातील नाद, ताल त्याचे वेगळेपण दर्शवितो. उखाण्याचे स्वरूप पाहिल्यानंतर म्हणी व वाक्प्रचार हा महत्त्वाचा मौखिक वाङ्मय प्रकार पाहू.

**६) म्हणी व वाक्प्रचार :-**

कोणत्याही भाषेचा वापर किती विविध तऱ्हेने केला जातो, आशयाची अभिव्यक्ती किती समर्थपणे केली जाते यावर त्या भाषेचे सामर्थ्य निश्चित करता येते. भाषेच्या अभिव्यक्तीमध्ये समाजात प्रचलित असणारे संकेत, परंपरेने चालत आलेल्या रूढी, परंपरा यांचा महत्त्वाचा वाटा असतो. म्हणूनच परंपरा, रूढी, संकेत यांचा कौशल्यपूर्ण वापर वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते यामध्ये केलेला असतो.

लोकजीवनात म्हणींचा तसेच वाक्प्रचारांचा नेहमीच उत्स्फूर्त वापर केला जातो. ग्रामीण भागातील अशिक्षित व्यक्तीसुद्धा अगदी सहजतेने बोलता–बोलता जीवनातील एखादा अनुभव वाक्प्रचारातून सांगून जाते. वाक्प्रचारांचे रचनेच्या दृष्टीने, अभिव्यक्तीच्या दृष्टीने म्हणींशी नाते असल्याचे दिसते. म्हणींपेक्षा कमी शद्बांत वाक्प्रचार बनलेला असतो.

म्हणी आणि वाक्प्रचारांना समाजजीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असून, त्यामधून त्या–त्या समाजाची संस्कृती अभिव्यक्त होते. समाजातील मानवी जीवन व्यवहाराचे, नीतिसंकल्पना, कल्पनावैभव, परंपरा इत्यादी गोष्टींचे चित्रण त्यामध्ये झाल्याचे आढळून येते.

**म्हणी व वाक्प्रचारांची मांडणी :-**

म्हणींची मांडणी आटोपशीर, सूत्रबद्ध व साहित्यिक असते. शैली पद्यबद्ध असते. म्हणी आकाराने जरी लहान असल्या तरी त्यातून मोठा आशय व्यक्त होतो. म्हणीला ताल व लय येण्यासाठी अनुप्रासात्मक रचना केलेली असते. लहानसेच पण चटकदार वचन, एक प्रकारचा

खोचकपणा, लघुता, व्यावहारिकता व लोकमान्यता असे म्हणींचे विशेष गुण आपणास सांगता येतात.

म्हणींचा वापर करताना त्यांचा क्रम बदलता येत नाही किंवा दुसऱ्या शब्दाचा वापर करता येत नाही. तसा जर वापर केला तर त्याचा अर्थ वेगळाच होतो आणि म्हणीचा परिणामही परिणामकारक होत नाही.

कमीत कमी शब्दांच्या साहाय्याने अधिकाधिक अर्थ देणाऱ्या किंवा व्यक्त करणाऱ्या बोलण्याला 'म्हण' ही संज्ञा आपणांस देता येईल.

दुर्गा भागवत यांच्या 'लोकसाहित्याची रूपरेखा' या पुस्तकात अलेक्झांडर क्राप यांनी केलेली म्हणींची व्याख्या दिली आहे. ती पुढीलप्रमाणे :-

'अगदी मार्मिकपणे शक्य तितक्या मोजक्या शब्दांत विदारक सत्य प्रगट करणारे वचन् म्हणजे म्हण.'[२७]

दुर्गा भागवत म्हणतात –

'म्हणी अनुभवाच्या खाणी'.[२८]

सरोजिनी बाबर यांच्या मते, 'कमीत कमी शब्दात जीवनातील सार्वत्रिक सत्य स्पष्ट करणारे वाक्य म्हणजे म्हण. '[२९]

आपण म्हणींच्या काही व्याख्या पाहिल्या यातून म्हणींचे स्वरूप लक्षात येते. लघुता, सूक्ष्मता, तीक्ष्णता आणि लोकमान्यता ही चांगल्या म्हणीची वैशिष्टे असतात असे म्हणता येईल.

वाक्प्रचार व वाक्संप्रदाय हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. मोजक्या शब्दात गहन अर्थ व्यक्त करणारा शब्दसमुदाय म्हणजे वाक्प्रचार असे आपणास म्हणता येईल. वाक्प्रचारातील शब्दांना शब्दकोशातील अर्थापेक्षा वेगळा अर्थ लाभलेला असतो. वाक्प्रचाराचा अर्थ शब्दशः अर्थाहून पूर्णपणे भिन्न व अर्थपूर्ण असतो. म्हणजेच शब्दाच्या मूळ अर्थाहून भिन्न अर्थ निर्माण करण्याचे सामर्थ्य वाक्प्रचारात असते.

उदा.– 'त्याने राम म्हटले, या वाक्याचा अर्थ त्याने, राम, या शब्दाचा उच्चार केला असा होतो. परंतु, या वाक्प्रचाराचा अर्थ त्याचा मृत्यू झाला असा होतो.

म्हणूनच इतर शद्बांपेक्षा वाक्प्रचार वेगळे व वैशिष्टयपूर्ण वाटतात.

विशिष्ट अर्थाने रूढ झालेल्या शद्बांना किंवा शद्बसमूहाला वाक्प्रचार म्हणतात. अशीही वाक्प्रचाराची व्याख्या आपणास करता येते.

डॉ. प्रभाकर मांडे यांनी वाक्प्रचाराची व्याख्या केली आहे. ती पुढीलप्रमाणे :-

'मोजक्या शद्बांत अनेक संदर्भीय अर्थ व्यक्त करणारा शद्बसमुदाय म्हणजे वाक्प्रचार होय.'[३०]

डॉ. शरद व्यवहारे यांच्या मते, 'विशिष्ट अर्थाने लोकजीवनात रूढ झालेल्या शद्बसमूहाला वाक्प्रचार म्हटले जाते.'[३१]

वरील दोन्ही व्याख्येवरून असे लक्षात येते की, वाक्प्रचार या शद्बालाच मुळी विशिष्ट अर्थ आहे. या वाक्प्रचारातील शद्बांना मूळच्या अर्थापेक्षा वेगळा अर्थ लाभलेला असून त्याला लोकमान्यताही मिळालेली आहे. हा वेगळा अर्थ लोकांनीच दिलेला असतो.

हा वाक्प्रचार उच्चारणाऱ्या व्यक्तीला आणि वाक्प्रचार ऐकणाऱ्या व्यक्तीला दोघांनाही हा वेगळा अर्थ माहित असतो. त्यामुळे वाक्प्रचाराचा संदर्भ ऐकणाऱ्याच्या चटकन लक्षात येतो.

अशा या वेगवेगळ्या प्रकारच्या म्हणी आणि वाक्प्रचार लोकजीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. अत्यंत अल्पाक्षरी, ताललयबद्ध, यमकांचा खटका आणि अनुभवांचे थेट आणि नेमके प्रक्षेपण करून वक्त्याचा अभिप्राय स्पष्ट करणं हे म्हणीचं काम ! तर अत्यंत मोजक्या शद्बांत, विशिष्ट अर्थाने लोकजीवनाचे संपन्न दर्शन घडविणे हे वाक्प्रचारांचे काम !

लोकवाङ्मयातील म्हणी व वाक्प्रचार यांचे हे दालन कलात्मक, कल्पक, व्यावहारिक शद्बयोजनेचा प्रत्यय तर देतेच पण, मराठी भाषेचे सामर्थ्य आणि सौंदर्यही उलगडून दाखवितात.

थोडक्यात, आतापर्यंत आपण लोकसाहित्याची संकल्पना, स्वरूप, व्याख्या तसेच लोकवाङ्मयाचे स्वरूप, त्याचे लोककथा, लोककथागीत, लोकगीत, लोकनाट्य, उखाणे, म्हणी व वाक्प्रचार असे प्रकार, त्यांच्या विविध व्याख्या पाहिल्या. आता पुढे आदिबंध म्हणजे काय ? ही संकल्पना समजावून घेऊ.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

ब) आदिबंधाचे स्वरूप :-

लोकसाहित्य जगभर प्रचलित आहे. विशेषत: लोककथा सर्वाधिक लोकप्रिय असा वाङ्मयप्रकार आहे. जगभरच्या लोककथांमध्ये अनेक आदिबंध, अनेक कल्पनाबंध असतात. हे आदिबंध, कल्पनाबंध यांमध्ये अनेक वेळा खूप साम्य आढळते. महाराष्ट्रात प्रचलित असणारी सटवाईची कथा आणि राजा इडिपस या जगप्रसिध्द नाटकाची कथा यातील कल्पनाबंध सारखाच आहे.

डॉ. सी. जी. युंग यांनी देशोदेशीचे लोकवाङ्मय तपासले. त्यातील भौगोलिक, कालिक, सांस्कृतिक विशेष बाजूला काढले. उरलेला जो शाश्वत आणि सार्वत्रिक असा मन:प्रवृत्तीचा भाग होता त्याचा अभ्यास केला, विश्लेषण केले. हा भाग म्हणजेच आदिबंध होय.[३२]

आदिबंधाचा, सिद्धांत हा मानवशास्त्र व मानसशास्त्र या दोन ज्ञान शाखांतील आधुनिक विचारप्रणालीतून उगम पावला आहे. हा सिद्धांत सर जेम्स् फ्रेझर यांच्या 'द गोल्डन बौ'या ग्रंथात आला आहे. [३३]

नॉर्थरप फ्राय यांच्या 'ॲनॉटॉमी ऑफ क्रिटिसिझम', 'फेबल्स ऑफ आयडेंटिटी'आणि मॉड बॉडकिन यांच्या 'आर्किटायपल पॅटर्नस् इन पोएट्री' या ग्रंथांनी 'आदिबंध', 'आदिबंधात्मक समीक्षा' हे शद्ब रूढ केले.[३४]

आदिबंधाच्या अभ्यास पद्धतीला दिव्यकथाात्मक, वंश चिन्हात्मक आणि विधिविधात्मक अभ्यास पद्धती अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते.

आदिबंध ही अबोध कल्पना असते. ही कल्पना समूहाच्या सांस्कृतिक परंपरेनुसार जाणिवेत आकार घेते. लोककथा, परिकथा, दैवतकथा म्हणजे आदिबंधाचे आविष्कार आहेत असे आपणांस म्हणता येईल.

आदिबंध स्थलकालातीत असतात कोणत्याही देशात व काळात ते शाश्वत राहतात. इंग्लंड असो वा अमेरिका, भारत असो वा आफ्रिका जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी आदिबंध

जसेच्या तसे असतात म्हणजेच आदिबंध वैश्विक असतात असे अभ्यास केल्यानंतर आढळले.

कार्ल युंग यांचा 'दि आर्किटाइप्स ॲण्ड द कलेक्टिव्ह अनकॉन्शस' हा ग्रंथ आदिबंध ही संकल्पना समजावून देतो. सामूहिक अबोध मनातील आशयद्रव्याला'आदिबंध' (आर्किटाइप्स) ही संज्ञा युंग यांनी दिलेली आहे.

युंग यांनी आदिबंध हे द्विध्रुवात्मक असतात असे दाखविले आहे. युंग यांच्या मते, 'सायकी' म्हणजे केवळ 'आत्मा' अथवा मनच नव्हे तर समग्र चेतन आणि निश्चेतन मानसिक प्रक्रिया होय. सायकीत चेतन आणि निश्चेतन या दोन वेगवेगळ्या गुणधर्माच्या स्तरांचा समावेश होतो. त्यांच्या मते, आदिबंध दोन टोकाचे असतात. त्याला एक काळी बाजू व एक उजळ बाजू असते.[३५]

आदिबंध हा निःसंशयपणे अबोध मनातील आशय असतो, सबोध मनात येतांना त्यात बदल झालेला असतो आणि व्यक्तीच्या मनाचे रंगही त्यात मिसळलेले असतात असे दिसून येते. आदिबंध हे दैवतकथांमधून, विधींमधून, परिकथांमधून व्यक्त झालेले आढळतात.

आदिबंध ही अमूर्त व रचनामूलक संकल्पना आहे. वाङ्मयात सातत्याने आवृत्त होणाऱ्या पात्रप्रतिमांच्या, घटना प्रसंगांच्या, कथाबंधांच्या मूळ आकृतिबंधांना साहित्यगत आदिबंध म्हणतात.[३६]

यावरून असे लक्षात येते की, एखाद्या वस्तूचे मूलरूप किंवा मूल आकृतिबंध म्हणजे आदिबंध होय.

आदिबंधाचा प्रभाव सर्वत्र दिसतो. आदिम मानवाच्या विधींमध्ये, दिव्यकथांमध्ये, प्रतीकांमध्ये आणि आजच्या मानवाच्या स्वप्नांमध्ये, कल्पनाविश्वांमध्ये, सर्जनशील कृतींमध्ये त्यांचा आढळ होतो. अंतर्मनाच्या ऊर्जामय प्रक्रियेत आदिबंधाचे अस्तित्व जाणवते. या प्रक्रिया अबोध मनात घडतात आणि अबोध व सबोधतेच्या मधल्या अवकाशातही घडतात. आदिबंधाचा प्रभाव भावरूप व अभावरूप भावनांमध्ये आढळतो. आकर्षणात आणि विभ्रमात, चिंतेत, उदासीनतेमध्येही आढळतो. संपूर्ण व्यक्तिमत्वाचा ताबा घेणाऱ्या कोणत्याही मनोवस्थेत आदिबंधाची अभिव्यक्ती आढळते.

आदिबंध वेगवेगळ्या मानस–प्रतिमांमधून व्यक्त होतात. वेगवेगळ्या आदिबंधाच्या वेगवेगळ्या प्रतिमा असतात. आदिबंधाचे वेगवेगळे पैलू वेगवेगळ्या प्रतिमांमधून व्यक्त होतात. आदिबंधाची रूद्र अथवा सौम्य–जीवनदायी रूपे भिन्न–भिन्न प्रतिमांमधून व्यक्त होतात.

मात्र एका आदिबंधाचे रौद्र स्वरूप दुसऱ्या आदिबंधाच्या रौद्ररूपाहून निराळे असते. उदा.– रूद्र माता आणि रूद्र पिता यांची अभिव्यक्ती करणाऱ्या प्रतिमा वेगळ्या असतात.

आदिबंधाची संरचना हे मानसिक संघटनेचे एक गुंतागुंतीचे जाळे असते. त्यात गतिशीलता, प्रतीकात्मकता आणि बोध–घटक असतात.त्यांचे केंद्र आणि एकात्मीकरण करणारा तो आदिबंधच असतो. आदिबंध निश्चेतनाच्या स्तरावर मानवी वर्तनाची दिशा निश्चित करत असतो.आदिबंध मानवी जाणिवेच्या कक्षेत येतो तो प्रतीकाच्या पातळीवर. प्रतीके ही आदिबंधाची व्यक्त दृश्यात्मकता होय. या दृश्यात्मकतेचे अव्यक्त, अप्रकट आदिबंधाशी नाते असते. प्रतीकांमध्ये देखील गतिशील आणि जड घटक असतात. ती मानवी व्यक्तिमत्वाचा ताबा घेतात, त्याला जागृत करतात, मोहून टाकतात, जाणिवेला आकृष्ट करतात आणि त्यांचा अर्थ लावायला प्रवृत्त करतात.

आदिबंधाची संकल्पना स्पष्ट करताना, फ्राय यांनी म्हटले आहे :–

'कविता म्हणजे केवळ निसर्गाचे अनुकरण करणारी कारागिरी नसते तर मानवी कौशल्याच्या अनेक कृतींपैकी ती एक असते. कविता ही संस्कृतीचे साधन असते. कवितेच्या सामाजिक अंगाचा विचार करताना प्रतीक हा संप्रेषणयोग्य असा एक घटक ठरतो'. त्यालाच फ्राय यांनी 'आदिबंध' पुन:पुन्हा येणारी एक प्रतिमा असे नाव दिलेले आहे. साहित्यात आणि संस्कृतीत पुन:पुन्हा येणारी प्रतिमा म्हणजे आदिबंध, एका कवितेचा दुसऱ्या कवितेशी संबंध जोडणारे प्रतीक म्हणजे 'आदिबंध'. त्यायोगे आपल्या वाङ्मयीन अनुभवाचे एकात्मीकरण आणि एकत्रिकरण होते, अशी फ्राय यांची धारणा आहे.

ज्या चित्र–पातळीवर आदिबंध चेतनाला दृष्टिगोचर होतात, ती प्रतीकाची पातळी असते. प्रतीकात्म प्रतिमा ही आदिबंधाची प्रतिरूपे असतात, त्याहून आदिबंध वेगळा असतो. आदिबंधाचे प्रतिरूपण होऊच शकत नाही. आदिबंध हे 'अदृश्य' असतात.

यासंदर्भात गंगाधर पाटील यांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे, ''माणूस आपल्या सभोवतीच्या चराचर सृष्टीचे, प्रेम–द्वेषादी मानसिक अवस्थांचे, विविध समाजसंस्थांचे असंख्य अनुभव युगायुगांतून घेत आला आहे. आणि ते आपल्या भावविश्वात खोल अंतर्भागात साठवीत आला आहे. हे सारे अनुभव भाषा, मिथ कला यांसारख्या प्रतीकसृष्टीद्वारे पिढ्यापिढ्यांतून संक्रमित होत होत व्यक्तीच्या व समाजाच्या भावविश्वात प्रवेश करतात व तेथे ते अगदी खोलवर रूजतात. अशा प्रकारे पिढ्यापिढ्यांतून संक्रमित होत असलेल्या एकाच प्रकारच्या असंख्य अनुभवांचे मानसिक अवशेष किंवा मूल आकृतिबंध म्हणजे आदिबंध होत''.

या आदिबंधांना मूर्त करणाऱ्या प्रतिमा म्हणजे 'आदिबंधरूप प्रतिमा' किंवा 'आदि – प्रतिमा' होत. स्त्री–पुरुष, माता–आदिमाता, घर–गुहा, वृक्ष–पक्षी, देव–दैत्य इत्यादींच्या आदिबंधरुप प्रतिमा स्वप्ने, मिथस्, दृष्टान्त, साहित्यादी कला यांमधून प्रकट झालेल्या दिसून येतात.'

म. सु. पाटील यांनी युंगची 'आदिबंध' ही संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे 'हे आदिबंध आशयदृष्ट्या पूर्वनियत नसतात. त्यांचे रचनात्मक अंग मात्र अनुवंशिक असते. हे आकृतिबंध म्हणजे व्यक्तीला नव्हे तर त्याच्या पूर्वजांना आलेल्या एकाच प्रकारच्या अगणित अनुभवांच्या रेखा होत. त्यांना रंगरूप प्राप्त होत ते वैयक्तिक जीवन जगताना. असे जगतानाच आदिबंध हे आशयपूर्ण होतात. हा आशय व्यक्तिपरत्वे वेगळा असतो. या आदिबंधाची जाणीव आपणास मनात किंवा कलासृष्टीत आवृत्त होणाऱ्या विशिष्ट प्रतिमांवरून होते. या प्रतिमांना युंगने आदिम प्रतिमा असे म्हटले आहे. त्यांचे स्वरूप बरेचसे प्राक्कथात्मक असते. त्या आदिबंधाच्या आविष्कारक असतात. आदिबंध हे मूर्त नसले तरी त्यांच्या आविष्कारक प्रतिमा वा कल्पना या मूर्त असतात. या प्रतिमा म्हणजे मानवाने आपल्या अस्तित्वकलहात आणि या जगाशी जुळते घेण्याच्या धडपडीत जे हजारो वर्षे अनुभव घेतले त्यांचे निक्षेप होत.'[३७]

डॉ. मॉड बॉडकिन या समीक्षकाने युंगप्रणित आदिबंधाच्या सिद्धान्ताचा आधार घेऊन 'आर्किटायपल पॅटर्नस इन पोएट्री' (१९३४) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाने आदिबंधात्मक समीक्षतेचा पाया घातला. लेखिकेच्या मते, आदिबंधाच्या आश्रयाने काव्यात्म अनुभवांचे दोन अंगांनी विश्लेषण करता येते.

१) एखाद्या समाजाच्या भावसृष्टीत सातत्याने पुनरावर्तित होणाऱ्या अनेकविध आदीप्रतिमांचा शोध घेऊन त्यांच्या विविध रूपांचा व आकृतिबंधांचा तुलनात्मक अभ्यास काव्यकृतीच्या अंगाने करता येईल. .

२) काव्यगत आदीप्रतिमांना प्रतिसाद देणाऱ्या रसिकाच्या मनातील आंतरिक अनुभवांचा अभ्यास रसिकाच्या अंगाने करता येईल.

युंगच्या आदिम प्रतिमा अथवा आदिबंध या संकल्पनेच्या आधारे बॉडकिन यांनी कवितेतील आदिबंधाचे विश्लेषण केलेले आहे. प्राचीन आणि अर्वाचीन कवितेत आढळणाऱ्या आदिम प्रतिमा म्हणजे आदिबंधात्मक आकृतिबंध अशी त्यांची धारणा आहे. गूढ, रहस्यमय गुहा, अपराधभावाने ग्रस्त यात्रिक, झरा, पुरलेले धान्य या काही प्रतिमा होत. आपल्या व्यक्तिगत जीवनातील भावनिक आकृतिबंध एखाद्या उत्स्फूर्त कृतीमधून अथवा स्वप्नांतून आपल्या प्रत्ययाला येतात, परंतु समूहजीवनातील आदिबंधात्मक आकृतिबंध पाहायचे असतील तर ते कवितेतूनच शोधावे लागतील, असे त्यांचे मत आहे.

या पुस्तकात त्यांनी 'हॅम्लेट', 'ऑरिस्टिस', 'इडिपस', या शोकात्मिकांतील, 'दि एनशंट मरिनर', 'पॅराडाइज लॉस्ट', 'कुब्लाखान', 'वेस्ट लॅण्ड' इत्यादी काव्यातील, डी. एच्. लॉरेन्स यांच्या कादंबऱ्यांतील आदिबंधात्मक आकृतिबंधाचा शोध घेतलेला आहे. 'हॅम्लेट', 'ऑरिस्टिस' या तिन्ही शोकात्मिकांमध्ये बाप आणि मुलगा यांच्यातील संबंधाचे चित्रण आहे. हा संबंध दोन परस्पर विरोधी पातळ्यांवरचा आहे. प्राचीन आशयसूत्रांच्या कवितेतील प्रभावी अभिव्यक्तीला प्रतिसाद देत असताना आपल्या अंत:करणातील जे काही उचंबळून येते, त्याचा बॉडकिन यांनी आदिबंधात्मक आकृतिबंध या शद्बाने निर्देश केला आहे.[३८]

कोणत्याही आदिबंधाचे कार्य कसे चालत असते हे स्पष्ट करण्यासाठी नायमॉन यांनी 'मार्ग' या आदिबंधाचे विश्लेषण केले आहे. हिमयुगातल्या प्रागैतिहासिक मानवात हा आदिबंध प्रथम प्रकट झाला. बराचसा निश्चेतनाचाच भाग असलेल्या विधिरूपातला हा मार्ग या मानवाला पर्वतांतल्या गुहांकडे घेऊन जाणारा होता. त्यात दडलेल्या आणि जवळजवळ दुर्गम अशा घळीत त्यांनी आपली

'देवळे' स्थापलेली होती. ज्या प्राण्यांच्या शिकारीवर त्यांचे जगणे अवलंबून होते त्या प्राण्यांची चित्रे त्यांनी तेथे काढली होती. त्यांचे यातुविद्यात्मक आणि धार्मिक महत्त्व आज कोणी नाकारीत नाही. त्याचबरोबर अतिशय कठीण आणि धोक्याचा मार्ग चालून गेल्यानंतर या गुहांपर्यंत जाता येते असा एक विधिविधानात्मक वास्तवाचा एक भाग म्हणूनही त्याचे महत्त्व आहे. नंतरच्या काळात जाणीव अधिक विकसित झाल्यानंतर मार्गाचा हा आदिबंध एक जाणीवपूर्ण असा आचार बनला. त्यामुळे आताही मंदिराच्या गर्भागारात प्रवेश करण्यापूर्वी किंवा नंतर प्रदक्षिणा घातली जाते. आदिबंधाच्या मार्गाच्या या प्रतीकाने आधुनिक मानवाच्या संज्ञेत महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. उदा.– विकासाचे मार्ग, तात्त्विक–राजकीय–कलात्मक वळणे इत्यादी.

आदिबंध आणि आदिबंधात्मक प्रतिमा–प्रतीके एकाच वेळी अनेक पातळ्यांवर उद्भवत असतात. त्यामुळे एका विशिष्ट आदिबंधाची रचना स्पष्ट करणे अवघड असते. अनेक आकार, प्रतिमा, प्रतीके, दृष्टिकोण, पैलू, संकल्पना एकाच वेळी निर्माण होत असतात; त्यातल्या काही एकमेकींमध्ये सरमिसळून जातात, तर काही वगळल्या जातात. या सगळ्याच गोष्टी एका आदिबंधाशी महामातेच्या आदिबंधाशी निगडित असतात असे नायमॉन यांचे मत आहे.[३९]

आदिबंध उत्स्फूर्तपणे व्यक्त होतात किंवा विशिष्ट व्यक्तीच्या जाणिवेच्या संदर्भात जेव्हा आदिबंध असंज्ञ मनाचा उत्स्फूर्त आविष्कार म्हणून व्यक्त होतात तेव्हा ते व्यक्ती आणि समूहाच्या निरपेक्ष कार्य करतात. परंतु याचा अर्थ ते सामूहिक नेणिवेच्या निरपेक्ष असतात असे नाही. वंश, लोकसमूह, ऐतिहासिक युग आणि प्रत्यक्ष स्थिती यांच्याशी त्यांचा संबंध असतोच. त्याचप्रमाणे ज्या व्यक्तींच्या कृतींमधून ते आविष्कृत होतात त्यांच्याही प्रत्यक्ष स्थितीचा संबंध असतो.

थोडक्यात सांगायचे झाले तर कला आणि संस्कृती, कलावंत आणि सांस्कृतिक प्रतीक विश्व यांचा शोध घेताना कलावंताच्या मनाचा, मानवाच्या मनाचा शोध अपरिहार्य ठरतो. कला हा मानवी संस्कृतीचा एक भाग आहे. त्यामुळे संस्कृतीच्या संदर्भात कलेचे मूल्यमापन आवश्यक ठरते. कलावंताचे मन म्हणजे व्यक्तीचे मन हे खरे आहे. पण, त्या कलावंताच्या मनात केवळ बालपणीच्या



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

स्मृतीच जपलेल्या असतात असे नाही, तर अखिल मानवजातीच्या बालपणाच्या स्मृती तेथे असतात. म्हणजे वैयक्तिक व सामूहिक नेणीव असते. हे सर्व आदिबंध त्याच्या कलेत, लेखनात आकार घेत असतात. लोककथांत, दैवत कथांत हे आदिबंध व्यक्त होतात. पुनः पुन्हा येणाऱ्या प्रतिमांमधून किंवा प्रतीकांतून व्यक्त होतात आणि एका वाङ्मयीन संहितेचे दुसऱ्या संहितेशी नाते जोडतात.

आदिबंध ही संकल्पना पाहिल्यानंतर आता आपण कल्पनाबंध ही संकल्पना समजावून घेऊ.

**क) कल्पनाबंधाचे स्वरूप :-**

साहित्यरचनेत वारंवार आवृत्त होणारे व सुस्पष्टपणे लक्षात येणारे रचनातंत्र, क्लृप्ती, करामत, घटनाप्रसंग, संकल्पना, आकृतिविशेष यांना 'कल्पनाबंध' म्हटले जाते.

कथा व गीतातील सर्वांत लहान मूलघटक अथवा कथाबीजे यांनाही 'कल्पनाबंध' म्हणतात.

या मूलघटकातूनच कथावस्तू किंवा संविधानक आकार घेत असते. एका कथेत एक किंवा अधिक कल्पनाबंधांची रचना असते. ही रचना कॅलिडिओस्कोप मधील बदलत्या रंगीत तुकड्यांच्या आकारांप्रमाणे निरनिराळ्या कथांमध्ये निरनिराळी असली तरी तिच्यातले मूलघटक कायम असतात; त्यांची स्थाने फक्त बदलतात व नवनवीन कथाबंध तयार होतात. लोककथा ह्या कल्पनाबंधातूनच आकार घेत असल्यामुळे लोककथांतील वारंवार आवृत्त होणारे कल्पनाबंध लोककथांच्या अभ्यासकांनी शोधून काढले आहेत.

अशा काही कल्पनाबंधांची उदाहरणे पुढीलप्रमाणे –

१) सवतीमत्सराच्या कथेत सवतीची मुले जन्मल्याबरोबर पळवणे, त्या जागी दगड किंवा प्राणी ठेवणे, सावत्र मुलावर विषप्रयोग करणे.

२) फसवणुकीच्या कथेत विश्वासघात, खोटे दोषारोपण, घमेंडीतून फसवणूक, व्यभिचारातून फसवणूक, सापळ्यात अडकवून फसवणूक, फसवणुकीने अटक वा सुटका, इत्यादी कल्पनाबंध आढळतात. काव्यरचनेतही असे मूल घटक आढळतात.

उदा.– प्रात:कालीन गीते, भूपाळ्या, काकड आरत्या, उष:कालाचे वर्णन, आपल्या प्रिय व्यक्तीला झोपेतून उठवण्याची विनंती असे कल्पनाबंध कवितांमधून आढळतात. लोककथांत असे कल्पनाबंध कधी स्वयंपूर्ण कथेच्या रूपात तर कधी कथेतील एखाद्या घटनेच्या रूपात आढळतात. अशा कल्पनाबंधांची वेधकता आणि लोकमानसातील स्मरणीयता यामुळे त्यांचा पुन:पुन्हा वापर होत असतो. पऱ्या, चेटकिणी, क्रूर सावत्र आई, बोलणारे पक्षी लोककथांत आढळतात तर परग्रहावरील सजीव, रोबो, उडत्या तबकड्या यांच्या स्वरूपात काही कल्पनाबंध विज्ञानकथांत येतात.

संतसाहित्यात देवाने मनुष्यरूप घेऊन भक्ताच्या मदतीला जाण्याचा कल्पनाबंध आढळतो. त्याचप्रमाणे संतचरित्रातील चमत्कार यांत महात्म्यांच्या नजरेने वा स्पर्शाने व्याधी दूर होणे, दुष्टांनी पाठवलेल्या मांस–मद्याची फुले–दूध होणे असे कल्पनाबंध आढळतात.

कधी पूर्वकालीन साहित्यातील प्रसिद्ध कवींच्या रचना उत्तरकालीन वाङ्मयात कल्पनाबंधाप्रमाणे आवृत्त होतात. तुकारामांचा अभंग मराठी कवितेत असा 'आवर्तक बंध' ठरला आहे. वाङ्मयेतिहास, परंपरा व नवता यांतील संबंध शोधण्यासाठी अशा आवर्तकबंधांचा उपयोग होतो.

लोककथांतील कथाविशेष आणि कल्पनाबंध –

कथाविशेष किंवा मूलकथा (Tale Type) आणि कल्पनाबंध किंवा कथाबीज (Motif) यासंबंधी स्टिथ थॉम्पसन यांनी विवेचन केले आहे.

कथाविशेषाची व्याख्या त्यांनी पुढीलप्रमाणे केली आहे. 'ज्या पारंपरिक कथेचे स्वरूप संपूर्णतया स्वतंत्र असून, जिचा अन्वय लावण्यास कोणत्याही इतर कथेची जरूर पडत नाही त्या कथेला कथाविशेष म्हणावे. अशा कथेत एक किंवा अनेक कल्पनाबंध असू शकतात.'[४१]

लोककथेत लहान आणि स्वत:चे अस्तित्त्व असलेला घटक असतो. त्याच्या रचनेतूनच लोककथा सिध्द होते. म्हणजेच लोककथेच्या या लहानातील लहान अंशाला 'कल्पनाबंध' असे म्हणतात.

म्हणजेच कथाविशेषांच्या मूलघटकाला 'कल्पनाबंध' म्हणतात. कल्पनाबंध म्हणजे लोककथांचा असा एक मूलघटक, जो स्वत: स्वतंत्रपणे स्थिर राहू शकतो. स्थिर राहण्यासाठी त्यांच्यात कोणते तरी असाधारण तत्त्व किंवा अपूर्वता असणे आवश्यक असते.

कल्पनाबंध तीन प्रकारचे असतात असे थॉम्पसन यांनी म्हटले आहे.[४२]

१) कथेतील पात्रे (कर्ता) – देवदेवता, राक्षस, आश्चर्यजनक प्राणी, अप्सरा, नाग, वनस्पती, तसेच मानव जसे लहान मूल, सावत्र आई वगैरे.

२) वस्तू आणि कथेच्या पार्श्वभूमीतील काही बाबी –
जादूच्या वस्तू, रूपांतर, श्रद्धा, विश्वास वगैरे.

३) घटना –
कथेत घडणाऱ्या घटना या विभागात येतात.

यावरून असे दिसते की, कथेच्या सर्व अंगांना किंवा कथानकाच्या सर्वच घटकांना कल्पनाबंधांनी व्यापलेले असते. कारण कथा व्यक्ती, कार्य आणि वस्तू यांच्या संयोगाने सिध्द होते. ज्याप्रमाणे कथानकाशिवाय कथा अस्तित्वात येत नाही, त्याचप्रमाणे कल्पनाबंधाशिवाय लोककथा संभवू शकत नाही, असे म्हणावयास हरकत नाही.

घटना हा जो कल्पनाबंधाचा एक प्रकार आहे तो अधिक व्यापक असून बरेचसे कथाविशेष हे या घटनांवरच आधारित असतात. कल्पनाबंध सारखे असूनही लोककथांचे पर्याय आढळतात. त्याचे कारण निरनिराळ्या प्रदेशांतील लोककथांचे कथक त्यांना स्वत:च्या पद्धतीने जुळवतात. कथाकारांच्या हातून त्यांना निरनिराळी रूपे प्राप्त होतात. ज्या हेतूने कथा सांगितली जाते तो हेतू, श्रोत्यांची आवड, प्रादेशिक जीवनविशेष, कथानिवेदकाचे निवेदन–कौशल्य, त्याचा मानसिक स्तर इत्यादी अनेक कारणे लोककथांची निरनिराळी पर्यायी रूपे बनण्यामागे असतात.

कल्पनाबंधाच्या आधारे जागतिक लोककथांचा अभ्यास करणे शक्य होते. कथाविशेषांमध्ये भिन्नता शक्य असते; परंतु कल्पनाबंधात एकात्मता असल्यामुळे पुढील क्रमांनुसार लोककथांचा अभ्यास करण्यात येतो.[४३]

प्रभाकर मांडे यांनी पुढीलप्रमाणे लोककथांच्या अभ्यासाचे स्वरूप मांडले आहे.

लोककथांचे उपलब्ध स्वरूप

तुलना —————— विश्लेषण

कथाविशेष (Tale Type)

तुलना —————— विश्लेषण

कल्पनाबंध (Motif)

म्हणजेच प्रथम लोककथांचे संकलन करून त्यांची तुलना केली तर असे आढळते की, ती काही मूलकथांची बनलेली आहे. ही मूलकथा किंवा कथाविशेष एका कथेपेक्षा अधिक कथांत दिसतात. हे कथाविशेष काही मूलघटकांनी म्हणजे एका किंवा अधिक कल्पनाबंधांच्या संयोगाने निर्माण झाले आहेत. निरनिराळ्या लोकांमध्ये किंवा कथाविशेषांमध्ये समान किंबहुना तेच कल्पनाबंध असतात. परंतु त्यांची रचना बदललेली असते. त्याच–त्याच कल्पनाबंधाच्या निरनिराळ्या लोककथा कशा बनतात हे स्पष्ट करताना शोभादर्शकाचे (Kalaediscope) उदाहरण दिले जाते.[४४]

शोभादर्शकाच्या नळीतील काचा त्याच वा तेवढ्याच असतात. परंतु, शोभादर्शक थोडाही हलवला तरी आतील काचांची रचना बदलते आणि नवीन आकृतिबंध तयार होतो. लोककथांचे स्वरूप निरनिराळे दिसले तरी कल्पनाबंध तेच असतात. लोककथांचा अभ्यास करताना त्यांचे जे मूलघटक कल्पनाबंध त्यांचे स्वरूप पाहणे आवश्यक असते ते यामुळेच.

काही कथाविशेष (Tale Types) :–

या कथाविशेषांत कल्पनाबंधांची पुनरावृत्ती झालेली आहे. मात्र केवळ कल्पनाबंधांनी रचना बदलल्यामुळे हे कथाविशेष बनले नाहीत, तर त्याच्या मुळाशी काही त्याची कथाबीजे आहेत. जे अनेक पर्यायांत इतरत्र आढळतात. दोन उदाहरणे पाहू.[४५]

उदा.– १) राजाचे स्वप्न :–

राजाला एक स्वप्न पडते. त्या स्वप्नात त्याला झाड दिसते. एका कथेत राजाला एक पार, त्यावर मारूतीचे मंदिर, त्या मंदिरावर चिंचेचे झाड आणि झाडावर बसलेले राघू–मैनेचे

जोडपे दिसते. दुसऱ्या एका कथेत राजाला असे स्वप्न पडून त्यात त्याला झाड दिसते. या झाडाचे खोड तांब्याचे, फांद्या चांदीच्या, पाने सोन्याची आणि फळांचे घोस मोत्यांचे असतात.

दोन्हीही कथांतील राजे त्यांच्या राजपुत्रांना या अद्‌भुत स्वप्नाचा अर्थ लावण्यास पाठवितात. सर्वात लहान राजपुत्र अनेक संकटांवर मात करून स्वप्नामागील सत्य शोधून काढतो. पहिल्या स्वप्नातील किमया राक्षसाची असते व दुसरे झाड हे तांबावंती, सोनावंती, मोतावंती या शापित अप्सरांचे बनलेले असते; छडी फिरविल्यावर अप्सरांचे झाडात रूपांतर होते व पुन्हा उलटी छडी फिरविल्यावर त्या अप्सरा बनतात.

या दोन्ही कथांत स्वप्नांचा कथाविशेष जरी एक असला तरी कल्पनाबंध मात्र भिन्न आहेत.

२) कवडीवर संसार करीन :-

'मी माझ्याच नशिबावर जगते' असे राजाची किंवा ब्राह्मणाची मुलगी म्हणते. दुसऱ्या एका कथेत 'मी कवडीवर संसार करीन' असे म्हणते. तिसरी एक अशीच कथा आहे. त्यात शेतकऱ्याची मुलगी तीन दाण्यांवर संसार करण्याची भाषा बोलते. या तीनही कथा एकाच कथाविशेषांचे निरनिराळे पर्याय आहेत. त्यांतील कल्पनाबंधांची रचना मात्र भिन्न आहे.

१) ब्राह्मणाची मुलगी फुटक्या कवडीवर संसार करीन असे म्हणते. हे म्हणणे राजा ऐकतो. तिच्याशी लग्न करतो. सातासमुद्रापलीकडे तिला ठेवतो. ती तेथून भुयार खणून साधूच्या वेषाने बाहेर येते व राजाची मर्जी संपादन करते.

२) शेतकऱ्याची मुलगी 'तीन दाण्यांवर संसार करीन' असे म्हणते. राजपुत्र ऐकतो. तिच्याशी लग्न करतो. पक्ष्यांचे बोलणे ऐकतो. पक्षी तिला मोती देतात. ती श्रीमंत होते. राजपुत्राची व तिची पुनर्भेट होते.

३) राजाची मुलगी 'मी माझ्याच नशिबावर जगते'अशी म्हणते. राजा तिचे लग्न दरिद्री ब्राह्मणाशी लावतो. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सर्वत्र अंधार पण तिच्या घरी दिवा असतो. तो दिवा पाहून लक्ष्मी घरात येतें म्हणून मुलगी श्रीमंत होते.

या तीनही कथाविशेषांत कल्पनाबंधांची रचना भिन्न-भिन्न असल्याचे आढळते.

कल्पनाबंधाशिवाय कथा होऊच शकत नाही. असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरू नये. कल्पनाबंध सारखे किंवा भिन्न असले तरी लोककथांचे अनेक पर्याय आढळतात. याला कारण लोककथांचे कथक, कथांचा हेतू, श्रोते, प्रादेशिकता इत्यादी बाबी होत. कल्पनाबंध स्थल, काल परिस्थितीशी निगडित पर्यावरणातून, मानवी जाणिवा व भावना यांमुळे निर्माण होत असतात. लोकजीवनाची सामाजिक, राजकीय, आर्थिक, नैतिक, धार्मिक आदी जी जी म्हणून अंगे मानता येतील, त्या त्या सर्व अंगांसंबंधाने कल्पनाबंध निर्माण होतात.

कल्पनाबंधाचे अध्ययन सर्वप्रथम अमेरिकेतील ब्लूमफिल्ड यांनी केले. आन्टी आर्ने यांच्या कथाविशेषांच्या वर्गीकरणाच्या आधारे स्टिथ थॉम्पसन यांनी जगातील सर्व उपलब्ध लोककथांत आढळणाऱ्या कल्पनाबंधांची सूची करण्याचे कार्य हाती घेतले. ब्लूमफिल्डच्या अनेक शिष्यांनी हे कार्य पुढे चालू ठेवले.[४६] कल्पनाबंध स्थल-काल-परिस्थितीशी निगडित पर्यावरणातून, मानवी जाणिवा व भावना यांमुळे निर्माण होत असतात. लोकजीवनाची सामाजिक, राजकीय, आर्थिक, नैतिक, धार्मिक अशी जी अंगे आपण मानतो. त्या सर्व अंगांसंबंधाने कल्पनाबंध निर्माण होतात.

अशा तऱ्हेने, लोककथांमध्ये, लोकगीतांमध्ये जे घटनाप्रसंग पुन:पुन्हा येतात, ज्या संकल्पना वारंवार वापरल्या जातात. त्यांना 'कल्पनाबंध' असे म्हटले जाते.

लोककथांमधील लोकगीतांमधील सर्वात लहान मूलघटक किंवा कथाबीज म्हणजेही कपल्पनाबंध होय असे म्हणता येईल.

'कल्पनाबंध' म्हणजे काय? हे आपण वेगवेगळ्या अभ्यासकांच्या मतांच्या आधारे समजावून घेतले.

आता 'रूपबंध' ही संकल्पना समजावून घेऊ.

**३) रूपबंधाचे स्वरूप :-**

कल्पनाबंध म्हणजे काय? ते आपण आधीच्या मुद्यात समजावून घेतले. 'स्त्रियांच्या कहाण्यांचा रूपबंधात्मक अभ्यास' करण्यासाठी आता रूपबंध म्हणजे काय? ही संकल्पना समजावून घेऊ.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

लोककथांच्या परंपरागत रूपबंधामधून मौलिक, नूतन समकालीन जीवनार्थ प्रकट करण्यात लेखकांचे कौशल्य प्रकट होत असते. स्त्रियांच्या कहाण्यांतर्गत कथा, पात्र, संवाद, निवेदन, वातावरण, आशय, धर्मश्रद्धा, रंजन, उद्‌बोधन आदी रचना प्रकारांना वेगळेपण कसे लाभते? इतर रचना प्रकारांपेक्षा ते वेगळे कोणत्या बाबतीत ठरते? ते घडत असताना कोणकोणत्या प्रक्रिया घडत असतात, त्या संबंधीचा विचार करणे म्हणजे 'रूपबंध' विचार होय.

इंग्रजीतील 'फॉर्म ' (Form) या शब्दाला प्रतिशद्व म्हणून मराठीत 'घाट', 'रूप', 'आकार', 'आकृती', 'रचना' हे शद्व वापरले जातात.[४७]

'घाट' या शद्वात व्यवस्थितपणा, प्रमाणबद्धता, बांधेसूदपणा या संकल्पनांचा अर्थ सामावलेला आहे. कुठल्याही लिखाणाचे लालित्य, ते लिखाण कलाकृती आहे की नाही हे, त्या लिखाणाच्या घाटावर, रूपावर, सुसंघटनेवर, फॉर्मवर अवलंबून असते. कोणत्याही कलाकृतीचा घाट किंवा रूपबंध त्या कलाकृतीत अंतर्भूत असलेल्या अनुभवाशी निगडित असतो.

आपल्या सर्वसाधारण जीवनातील अनुभव असा आहे की, एखादी वस्तू, पदार्थ दृष्टीस पडला किंवा एखादा आवाज ऐकला की आपणास त्या गोष्टीचे ज्ञान होते. म्हणजेच त्या वस्तूचा आशय, वर्ण्य विषय आपणाला जाणवतो. त्या रूपावरून त्या वस्तूचा आशय व आशयावरून वस्तूचे रूप ज्ञानेंद्रियाद्वारा दैनंदिन जीवनात आपण जाणत असतो.

रूपघटक आणि रूपसाधने या दोन्हींचा मेळ 'घाट' अथावा 'रूपबंध' या संकल्पनेत गृहीत आहे.[४८] लक्षणीयता, आविष्कारत्मकता, वैशिष्टयपूर्णता या सौंदर्याची जाणीव निर्माण करणाऱ्या घटकांनी साहित्यकृतीला रूपबंध प्राप्त होत असतो.

मूळ घटकांचे स्वरूप आणि त्या घटकांची मांडणी किंवा रचना, त्या रचना प्रकाराचा 'रूपबंध' निश्चित करीत असते. साहित्यकृतीच्या घटकांची एकजिनसी संघटना म्हणजे साहित्यकृतीचा रूपबंध, असे गंगाधर पाटील यांनी म्हटले आहे.[४९]

साहित्यातील अनुभव, आशयसूत्र, शद्वबंध, वाक्यबंध, प्रतिमा, पात्र, प्रसंग, कथानक निवेदक इ. साहित्यकृतींचे घटक असतात. या सर्व घटकांची विशिष्ट रीतीने संघटना झालेली असते. या घटकांना एकत्रित करणारे कोणते तरी आशयसूत्र साहित्यकृतीत कार्यशील असते.

हे आशयसूत्र एखाद्या कथेच्या, कवितेच्या अनेक घटकांना एकत्रित करते. ज्याप्रमाणे माळेतील मणी एखाद्या धाग्याने एकत्रित गुंफलेले असतात, त्याप्रमाणे साहित्यकृतीचे अनेक घटक एखाद्या आशयसूत्राने एकत्रित गुंफले जातात. त्यामुळे साहित्यकृतीला एकजिनसी संघटना प्राप्त होते.

या एकजिनसीपणालाच सेंद्रिय एकता असे म्हटले जाते. सेंद्रिय एकतेमुळे साहित्यकृतीच्या रूपबंधाला कलात्मक सौंदर्य लाभते. या भूमिकेतून आपण एका कवितेतील रूपबंधाचे स्वरूप पाहू.

हा ज्ञानदेवांचा एक अभंग आहे –

'इवलेसे रोप लावियेले द्वारी
तयाचा वेलु गेला गगनावरी ।।
मोगरा फुलला ऽऽऽ मोगरा फुलला
फुले वेचितां भार कळियांसी आला ।।
मनाचिये गुंती गुंफियेला शेला
बाप रखुमा देवीवरीं विठ्ठली अर्पिला ।।'

या अभंगात एका भक्ताच्या मनात भक्तिभावाचे इवलेसे बीज अंकुरते आणि ते आकाशाशी, अनंताशी एकरूप होण्याची आकांक्षा धरते. क्षणार्धातच ते आकाशापर्यंत वाढत जाते. आकाशलेल्या या मोगऱ्याच्या वेलावर, भक्तिभावनेची शुभ्र शुभ्र फुले फुलतात आणि बहरत राहतात. शेवटी त्या वेलाचे मन आपली फुले परमेश्वराला अर्पण करीत, विश्वचैतन्याशी एकरूप होत, निरंतरपणे फुलतच राहाते. आत्मचैतन्याची, विश्वचैतन्याची एकरूप होण्याची, ही आत्मिक प्रक्रिया हे या कवितेचे काव्यबीज किंवा आशयसूत्र आहे. ते मोगऱ्याच्या काव्यात्म प्रतिमेतून कल्पकतापूर्णरीतीने साकारले आहे. हे आशयसूत्र कवितेतील भावार्थघटक, नादघटक, चरणबंध, रोप, गगन, फुले आदी प्रतिमा या सर्व काव्य घटकांना एकत्र गुंफून त्यांची एकजिनसी संघटना करते. ही एकजिनसी संघटना म्हणजे कवितेचा सेंद्रिय रूपबंध (ऑरगॅनिक् फॉर्म) होय.[१०] रूपबंधाची ही सेंद्रिय एकता कवितेला कलात्म सौंदर्य प्राप्त करून देते.


16601

या कवितेच्या उदाहरणातून आपण तिच्या रूपबंधाचे व सौंदर्याचे स्वरूप पाहिले. या पार्श्वभूमीवर या सेंद्रिय रूपबंधाची अधिक नेमकी व्याख्या अशी करता येईल.

'साहित्यकृतीच्या घटकांची आणि घटकाघटकांमधील परस्परसंबंधांची एकजिनसी संघटना म्हणजे साहित्यकृतीचा सेंद्रिय रूपबंध होय.'

कोणत्याही कवितेला एक दृश्य, लिखित किंवा मुद्रित असे रूप असते. पृष्ठावर त्या कवितेची मांडणी कशी केली आहे? मधोमध ती छापली आहे का ? आसपास जागा किती सोडली आहे? अक्षरांचे वळण कोणते वापरले आहे? हे या दृश्य रूपाचे घटक असतात. कवितेचा हा कायिक रूपबंध होय.

कवितेचे एक श्राव्य रूपही असते. कानांवरून ती जाताना ध्वनी जाणवतात, ध्वनींचे बंध जाणवतात. शद्बांतील नाद, त्या नादांची पुनरावृत्ती, ओळींमधील नादांचे आंदोलन, ताल, लय, समांतरता, धृवपदांचा, यमकांचा, अनुप्रासांचा वापर, छंद वा वृत्त यांची योजना यांतून कवितेला नादाचा रूपबंध प्राप्त होतो.

कवितेच्या रूपबंधाविषयी आ. रा. देशपांडे (कवी अनिल) यांनी लिहिले आहे :- ''कवितेत रूपबंधाला फार महत्त्व आहे, कारण ते काव्यसौंदर्याच्या अंगांमधील एक महत्त्वाचे अंग आहे. रूपबंधाची जाणीव अनेक प्रकारची असते. एकीला कायिक जाणीव म्हणता येईल. म्हणजे तिथे बौद्धिक क्रिया नसते. नुसती कानाला गोड लागते, तिची लिखित वा छापील मुद्रा मनात भरते, अशी एखादी कविता असते. हे रूपबंधाचे कायिक अंग रूपबंधाची दुसरी जाणीव नादावर्तनाची. म्हणजे शद्बांतील नादांच्या संवादाची, विरोधाची, पुनरावृत्तीची, त्यांनी घडलेल्या आकृतिबंधाची, आघात, अनाघात, उदात्त, अनुदात्त उच्चारण आणि आवाजाचा चढउतार इत्यादीतून होणारी, तिसरी जाणीव तालावर्तनी, म्हणजे अभिव्यक्तीतील आंदोलन, ताल, लय यातून होणारी. इथे सुयोग्य छंदाश्रयही रूपबंधाची जाणीव उत्पन्न करण्यास साहाय्यक होत असतो. चौथी जाणीव शद्बध्वन्यात्मक म्हणजे सहजपणे जुळलेले यमक, अंतर्गत नादसाम्य, यमकाचा योजनाबंध, अनुप्रास, स्वाभाविक ध्वनींचे अनुसरण करणारी शद्बसंहती, एखाद्या शद्बाची सलग पुनरूक्ती इत्यादीतून होणारी

रूपबंधाच्या अंगाची जाणीव. वर सांगितलेली रूपबंधाची जाणीव करून देणारी अंगे पुष्कळदा एकमेकांत मिसळून गेलेली असतात. पण ही सर्व रूपबंधाची बाह्यांगे आहेत.''

'शद्वात्मक' आणि 'अर्थात्मक' ही दोन्ही अंगे मिळून कवितेचा रूपबंध घडतो. म्हणजेच कवितेच्या संदर्भात वृत्त, लय, रचना, शद्वकळा, अलंकार, प्रतिमा, प्रतीक यांची योजना हे रूपबंधाचे घटक मानले जातात. कवितेच्या रूपबंधाच्या बाह्य अंगाचा, इंद्रियगोचर रूपाचा तिच्या मानसिक, अर्थात्मक, आशयात्मक, अंगाशी संबंध असतो. कविता या साहित्यकृतीत कायिक, नादरूपात्मक आणि मानसिक रूपबंध एकात्म झालेले असतात.

कहाण्यांच्या संदर्भात स्त्रियांच्या भावभावना, विचार, अनुरूप शद्वांची वर्णरचना, उच्चारातील मृदुत्व, काठीण्य, ताल–लय–सूर, भाषेचा लवचिकपणा, छोटी–छोटी वाक्ये या अशा विविध घटकांतून रूपबंध उलगडत जातो. यातील प्रत्येक कहाणीच्या रचनाप्रकारबंधाची वेगळीक दाखविणारी वैशिष्ट्ये पाहाणे, त्या रचनाप्रकारबंधाचे एकमेकाशी असलेले नातेसंबंध तपासणे, कहाण्यांतील साम्यस्थळे विषमस्थळे शोधणे यांचा समावेश रूपबंधात होतो. कहाणीमधून रूपबंधाचा, शोध घेणे म्हणजे कहाणीतील सौंदर्यात्मक अर्थाचा शोध घेणे होय. कहाणीचा रूपबंध म्हणजे तिचे बाह्यांग किंवा पृष्ठरूप नव्हे, ही गोष्ट येथे लक्षात घेतली पाहिजे.

कहाणीचा अर्थ, तिचा रूपबंध, तिचे सौंदर्य हे तिच्या अंगभूत गुणातच वसत असते. तिचे अस्तित्व तिच्या स्वत:च्या नियमांनी तयार झालेले असते. म्हणून ती एक स्वयंपूर्ण व स्वतंत्र वस्तू असते.

'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह' या पुस्तकातील प्रत्येक कथा कहाणीच्या रूपबंधाने संस्कारित झालेल्या आहेत. त्यातील दोन कहाण्यांची उदाहरणे पाहू.[११]

उदा.– 'श्रीगणपतीची कहाणी' या कथेतील निवेदन पहा –

'ऐका परमेश्वरा गणेशा, तुमची कहाणी निर्मळ मळे, उदकाचे तळे, बेलाचा वृक्ष, सुवर्णाची कमळे, विनायकाची देवळे रावळे––––'

किंवा 'धरित्रीची कहाणी'यातील निवेदन पहा –

'ऐका परमेश्वरा, धरित्रीमाये, तुमची कहाणी. आटपाटनगर होतं. नगरात एक ब्राह्मण होता -----'

या व अशा प्रकारच्या कहाणीतील शद्बांना असलेली नाद-लय कानांना आकर्षक वाटते, एखादे पद्यकाव्य ऐकत आहोत असे वाचकाला वाटत असते. 'ऐका परमेश्वरा, गणेशा, धरित्रीमाये'या संबोधनातून असे जाणवते की, ती-ती कहाणी जणू काही त्या त्या देवालाच उद्देशून सांगितली आहे.

व्रतकथेत श्रद्धा निर्मितीचा प्रयत्न केलेला असतो. 'दु:खी असणे --- व्रताचा उपाय --- सुचविण्यात येणे --- व्रताचरण करणे --- फलप्राप्ती होणे --- व्रताचे विस्मरण ------ पुन्हा संकट --- दु:ख --- व्रताचे स्मरण --- क्षमायाचना --- व्रताचरण --- पूर्ववत फलप्राप्ती ---- आनंद'.

अशा तऱ्हेचा व्रतकथेचा आकृतिबंध असतो. मग, पुढे त्यातूनच रूपबंध उलगडत जातो. विविध वर्णने, दृष्टांत, अलंकारिक भाषा, छोटी-छोटी वाक्ये, कहाणीला असणारा विशिष्ट नाद - ताल - लय, स्त्रियांच्या भावभावना, भाषेतील लवचिकता, अर्थ पेलून धरण्याचे सामर्थ्य कहाण्यांतील शद्बांत असल्याचे प्रत्ययाला येते. कहाणीतील पात्रांच्या उच्चारात एक प्रकारचा हळूवारपणा, कोमलता, मृदुत्व असल्याचे जाणवते. मग, तो कुणी एक राजा असो, ब्राह्मण असो किंवा एखादी स्त्री असो.

या कहाण्यांतील एक-एक शद्ब म्हणजे अमोल मोती आहे. कहाण्यांतील हे शद्बवैभव डोळ्यांना, कानांना आणि मनाला आनंद देते.

शब्दांची द्विरूक्ती आणि अभ्यस्त शद्बांची योजना यामुळे कहाण्यांतील भाषेला एक प्रकारची गेयता, प्रवाहीपणा प्राप्त झालेला दिसतो.

उदा.- 'गहू-मूग' या शद्बासाठी 'गव्हाळे- मुगाळे ' असा शद्ब योजलेला आढळतो. याप्रमाणेच दोरा-तातू, लग्न-लगीन, दारिद्र्य -दळिद्र, देवळात-देऊळी, स्वयंपाक -सैंपाक, गर्भारा - गाभारा. असे शद्ब योजलेले दिसतात, याशिवाय 'देवळेरावळे, मुलंबाळं, जाडंभरडं, फाटकंतुटकं, उष्टंमाष्टं, दागदागिने' असे अभ्यस्त शद्ब कहाणीत पाहावयास मिळतात.

सामान्यत: स्त्रियांच्या बोलण्यात प्रश्नार्थक वाक्ये फार येतात. कहाण्या या स्त्रीभोवतीच गुंफलेल्या असल्याने, तिच्या अशा प्रश्नार्थक बोलण्यामुळे कहाणीतील निवेदन अधिक प्रभावी झाले आहे.

'कहाणी ही स्त्रियांच्या कथाविष्काराचे बीजरूपच म्हटले पाहिजे' असे मंगला वरखेडे म्हणतात.[५२] व्रतकथांत हे कहाणीचे बीजरूप आपल्याला आढळते. कारण, 'कहाणी' ही कुणाला तरी सांगायची असते आणि ती कुणीतरी ऐकायची असते असे गृहीत धरूनच तिची रचना होते. त्यामुळे या श्राव्यकथेत निवेदकाचा श्रोत्यांशी सतत संवाद चालू असतो. श्रोत्यांचे अवधान कायम टिकविण्यासाठी अधूनमधून श्रोत्यांना विश्वासात घेत, त्याला आपल्या कहाणीशी बांधून घेत, घेतला वसा दुसऱ्याला देत निवेदक कहाणीतल्या गोष्टीला पुढे नेत असतो.

कहाणीचे निवेदन रचनेच्या दृष्टीने लक्षणीय असते. कहाणीत वर्णन कमी असते. कहाणी हा मौखिक वाङ्मयप्रकार आहे. त्यामुळे तिच्या संरचनेचे टप्पे स्पष्ट असतात. प्रत्येक कहाणीची सुरुवात –

'ऐका परमेश्वरा, ---, तुमची कहाणी' अशी असते. यात रिकाम्या जागी त्या त्या देवाचे किंवा वाराचे नाव येते. प्रत्येक कहाणीचा शेवट 'ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.'असा असतो. सर्वच नसल्या तरी बऱ्याच कहाण्यांत सुरुवातीच्या वाक्यानंतर 'आटपाट नगर होतं. तिथं एक --- होता.' ही वाक्ये येतात. रिकाम्या जागी राजा, ब्राह्मण, शेतकरी अशी सामान्यनामे येतात. त्याचप्रमाणे शेवटच्या वाक्यापूर्वी '--- यांना जसा --- प्रसन्न झाला तसा तुम्हा आम्हा होवो'. किंवा 'ती सुखानं नांदू लागली, तसं तुम्ही आम्ही नांदू'.

अशी आशीर्वादपर, विध्यर्थ आख्यातरूपी क्रियापदयुक्त वाक्ये येतात. यातही रिकाम्या जागी संबंधित देवाचे नाव येते.

अशा रीतीने कहाणीच्या सुरुवातीला व शेवटी येणाऱ्या वाक्यांना एक प्रकारचा ताल–लय असतो. त्यातील नादमयता ऐकणाऱ्याला मोहून टाकत असते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

थोडक्यात, कहाणीच्या मूळ घटकांचे स्वरूप, त्या घटकांची माडणी किंवा रचना या सगळ्यांचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधिकेत करायचा आहे.

*****

## संदर्भ ग्रंथसूची


१) भवाळकर तारा, 'लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती – २००९, पृष्ठ क्रमांक –५.

२) मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती – १९७८, पृष्ठ क्रमांक –६.

३) भागवत दुर्गाबाई, 'लोकसाहित्याची रूपरेखा', वरदा बुक्स, पुणे, प्रथम आवृत्ती – १९५६, पृष्ठ क्रमांक –१४.

४) मांडे प्रभाकर, उनि., पृष्ठ क्रमांक –१५.

५) मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती – १९७८, पृष्ठ क्रमांक –१५

६) व्यवहारे शरद, 'लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती – जानेवारी १९९९, पृष्ठ क्रमांक –१३.

७) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१३.

८) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१४.

९) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१४.

१०) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१४.

११) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१५.

१२) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१५.

१३) मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती – १९७८, पृष्ठ क्रमांक –१७९.

१४) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१८०.

१५) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१८१.

१६) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१८३.

१७) शिंदे विश्वनाथ, 'लोकसाहित्यमीमांसा भाग – २', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती – २००६, पृष्ठ क्रमांक –२१७.

१८) मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती – १९७८, पृष्ठ क्रमांक – २७३.

१९) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –२७४, २७५.

२०) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –२४१.

२१) जोशी महादेवशास्त्री व इतर संपादक, 'भारतीय संस्कृतिकोश' आठवा खंड, राजस्थान ते बिहार, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्रथम आवृत्ती – १९७४, पृष्ठ क्रमांक –४२१.

२२) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –४२१.

२३) गणोरकर प्रभा, डहोक वसंत आबाजी, दडकर जया, भटकळ सदानंद, राजवाडे आशा, वरखेडे रमेश संपादक, 'वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोश', ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती – २००१, पृष्ठ क्रमांक –३४४.

२४) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –३४४.

२५) भागवत दुर्गाबाई, 'लोकसाहित्याची रूपरेखा', वरदा बुक्स, पुणे, प्रथम आवृत्ती – १९५६, पृष्ठ क्रमांक –२७८.

२६) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –२७८.

२७) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –३००.

२८) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –३००.

२९) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –३०१.

३०) व्यवहारे शरद, 'लोकसाहित्य : उद्गम आणि विकास', विश्वभारती प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती – १९८७, पृष्ठ क्रमांक –९७.

३१) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –९७.

३२) गणोरकर प्रभा, डहोक वसंत आबाजी, दडकर जया, भटकळ सदानंद, राजवाडे आशा, वरखेडे रमेश संपादक, 'वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोश', ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती – २००१, पृष्ठ क्रमांक –१०६.

३३) सहस्त्रबुध्दे अनिल, 'लोकबंध', दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, प्रथम आवृत्ती – १९९५, पृष्ठ क्रमांक –८२.

३४) गणोरकर प्रभा, उनि., पृष्ठ क्रमांक –१०५.

३५) गणोरकर प्रभा, डहोक वसंत आबाजी, दडकर जया, भटकळ सदानंद, राजवाडे आशा, वरखेडे रमेश संपादक, 'वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोश', ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती – २००१, पृष्ठ क्रमांक –१०६,१०७.

३६) वरखेडे मंगला, 'स्त्रियांची नवकथा : वाटा आणि वळणे', कैलासराणा प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती– १९९६, पृष्ठ क्रमांक – १२.

३७) गणोरकर प्रभा, उनि., पृष्ठ क्रमांक –१०७ ते १११.

३८) गणोरकर प्रभा, डहोक वसंत आबाजी, दडकर जया, भटकळ सदानंद, राजवाडे आशा, वरखेडे रमेश संपादक, 'वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोश', ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती – २००१, पृष्ठ क्रमांक –१११.

३९) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१०९ ते ११०.

४०) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –१५२.

४१) मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती – १९७८, पृष्ठ क्रमांक –२२८.

४२) मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती – १९७५, पृष्ठ क्रमांक –७६.

४३) मांडे प्रभाकर, उनि. पृष्ठ क्रमांक –२३१.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

४४) कोळेकर वैदेही, 'मराठी लोककथा–स्वरूपमीमांसा', सविता प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती – १९८७ ,पृष्ठ क्रमांक –४०.

४५) मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती – १९७५, पृष्ठ क्रमांक –७७ ते ८०.

४६) मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती – १९७८, पृष्ठ क्रमांक –२३१ – २३२.

४७) गणोरकर प्रभा, डहोक वसंत आबाजी, दडकर जया, भटकळ सदानंद, राजवाडे आशा, वरखेडे रमेश संपादक, 'वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोश', ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती – २००१, पृष्ठ क्रमांक –२०७.

४८) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –२०८.

४९) रायकर सीताराम, यादव आनंद, टापरे पंडित, जोशी सुरेश, पुंडे दत्तात्रय संपादक, 'वाङ्मयीन वाद संकल्पना व स्वरूप' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती – १९९०, पृष्ठ क्रमांक –२०८.

५०) तत्रैव, पृष्ठ क्रमांक –२०८, २०९.

५१) रायकर सुधाताई संपादिका, 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह', रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस, मुंबई, नवीन आवृत्ती – २००९, पृष्ठ क्रमांक –३ आणि ७.

५२) वरखेडे मंगला, 'स्त्रियांची नवकथा : वाटा आणि वळणे', कैलासराणा प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती– १९९६, पृष्ठ –२२८.

*****